सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, ०१ मार्च २०२५ वर्ष दुसरे अंक ३३५ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

उत्तराखंडमध्ये हिमकडा कोसळला! ५७ जण अडकले

देहरादून : उत्तराखंडमधील चमोली येथील माना गावात आज शुक्रवारी हिमकडा तुटल्याने मोठा अपघात (इरवीळपरींह ऋश्चरलळशी उेश्रश्चरींशी) झाला आहे. या घटनेत ५७ कामगार बर्फाखाली गाडले गेले होते, मात्र यातील १६ जणांना बाहेर काढण्यात यश आले आहे. अजूनही ४१ कामगार बर्फाखाली दबलेले आहेत. या ४१ जणांचा शोध सुरू आहे. अपघातानंतर प्रशासन आणि बीआरओ टीम घटनास्थळी रवाना झाली आहे. सध्या आयटीबीपी आणि गढवाल स्काउटची टीम बचाव कार्यात व्यस्त आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अपघातावेळी एका खाजगी कंत्राटदाराचे कामगार मोठ्या संख्येने घटनास्थळी काम करत होते. हे सर्वजण बीआरओच्या कराराखाली काम करणाऱ्या कंत्राटदाराचे कामगार होते. जेव्हा हिमस्खलन झाले तेव्हा सर्वजण इकडे तिकडे धावू लागले. त्यापैकी काही जण पळून जाण्यात यशस्वी झाले, मात्र ५७ कामगार बर्फाखाली अडकले होते. यातील १६ जणांना वाचवण्यात यश आले आहे.

या घटनेची माहिती मिळताच प्रशासन आणि बीआरओ टीमने घटनास्थळी धाव घेतली. आपत्ती व्यवस्थापन सचिव विनोद सुमन यांनी सांगितले की, चमोली बद्रीनाथ धाममधील माना गावाजवळील एक हिमकडा कोसळल्यामुळे ५७ कामगार अडकले आहे. तर १६ जणांना वाचवण्यात यश आलं आहे. उर्वरित ४१ कामगारांचा शोध सुरू आहे. दरम्यान, चमोलीचे जिल्हा दंडाधिकारी संदीप तिवारी म्हणाले की, दळणवळण व्यवस्था अत्यंत वाईट स्थितीत असल्याने योग्य माहिती मिळत नाही.

चमोलीच्या वरच्या भागात गेल्या काही दिवसांपासून जोरदार बर्फवृष्टी होत असल्याचे सांगण्यात येत आहे. हवामान खात्याने आजसाठी (दि. २८) आधीच ऑरेंज अलर्ट जारी केला होता. ३२०० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या भागातही बर्फवृष्टीची शक्यता होती. हिमस्खलनाची भीतीही व्यक्त करण्यात आली. आता बद्रीनाथ मंदिरापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या महामार्गाजवळ हिमकडा कोसळला आहे. उत्तराखंडमधील माना गाव भारत आणि चीनच्या सीमेवर आहे. येथे एक आर्मी बेस कॅम्प आहे. म्हणून, सैन्य प्रथम बचाव कार्यात गुंतलं आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ पथके रवाना करण्यात आली आहेत. हिमकडा कोसळल्यामुळे बीआरओ पथकांनी बचावकार्यही सुरू केलं आहे.

पुणे जिल्ह्यातून दररोज १४ महिला बेपत्ता

पुणे : एकीकडे शहरात बलात्काराच्या घटनांमुळे महिला खरेच किती सुरक्षित आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत असताना, शहरातून महिला व तरुणी बेपत्ता होण्याच्या घटनांमध्येही मोठी वाढ होताना दिसून येत आहे. १ जानेवारी ते २७ फेब्रुवारीदरम्यानच्या कालावधीत पुणे जिल्ह्यातून (पुणे शहर, पिंपरी- चिंचवड आणि ग्रामीण) तब्बल ७६७ तरुणी आणि महिला बेपत्ता झाल्या आहेत.

पुणे जिल्ह्याचा मोठा विस्तार आहे. तसेच, पिंपरी- चिंचवड आणि पुणे शहर या दोन महत्त्वाच्या महानगरांचा समावेश या जिल्ह्यात आहे. नोकरी, शिक्षण आणि व्यवसायाच्या निमित्ताने राज्यातील नागरिकांबरोबरच परप्रांतियांचा देखील मोठा ओढा या शहरांकडे आहे.

पुणे शहरातून २४३, पिंपरी- चिंचवडमधून २७१ तर पुणे ग्रामीणमधून २५३ महिला आणि तरुणी बेपत्ता झाली आहे. या बेपत्ता महिलांचा विचार केला, तर दिवसाला सुमारे चौदा तरुणी बेपत्ता झाल्याचे पोलिसांच्या नोंदीवरून दिसून येते. काही बेपत्ता घटनांच्या नोंदीमध्ये काही महिला पुन्हा घरी परतल्याची माहिती आहे. परंतु, अनेक महिलांचा अद्यापही पत्ता लागला नसल्याचे वास्तव यानिमित्ताने समोर आले आहे.

ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑप बँकेचे आज थाटात उद्घाटन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ फेब्रुवारी

येथील तिरूपती नगरातील ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑप बँकेचे दि १ मार्च रोजी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांच्याहस्ते उद्घाटन होणार आहे. यावेळी स्व ओमप्रकाश देवडा यांच्या पूतळ्याचे अनावरण आरबीआयचे संचालक सतीश मराठे यांच्याहस्ते तसेच सत्य संकल्पाचा प्रवास या गॅलरीचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचेहस्ते होणार आहे.

याप्रसंगी कर्नाटकचे मंत्री एच के पाटील, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री ललीत गांधी, राज्यमंत्री हेमंत पाटील, खा नागेश पाटील आष्टीकर, खा अजित गोपछडे, लक्ष्मी दास, उदय जोशी, मिलींद काळे, ज्ञानचंद गर्ग, अजय ब्रम्हेचा, आ तान्हाजीराव मुटकुळे, आ. प्रज्ञा सातव, आ. संतोष बांगर, आ. राजू नवघरे, आ. जयश्री चव्हाण, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुकुंद सावजी, संचालक दिलीप चव्हाण, माजी खा सुर्यकांता पाटील, माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, माजी खा गणेश दुधगावकर, माजी खा शिवाजीराव माने, माजी खा सुभाष वानखेडे, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, माजी आ. गजनन घुगे, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा आदींची उपस्थिती असणार आहे.

यानिमित्त मराठवाडा अर्बन बॅक्स असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर यांचे मार्फत अर्बन बँकासाठी प्रशिक्षण शिबीरात आरबीआयचे संचालक सतीश मराठे, मिलींद काळे, प्रभात चतुर्वेदी मार्गदर्शन करणार आहेत तसेच संध्याकाळी बँकेचे संचालक, पदाधिकारी यांचा सत्कार तसेच संगीत रजनीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दि २ मार्चला ओमप्रकाश देवडा यांच्या पुण्यतिथीनिमित्त मोफत आरोग्य शिबीर, त्यानंतर हभप अमोल बोधले यांचे किर्तन, दि ३ मार्च ला सकाळी मोफत आरोग्य शिबीर तसेच भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, बँकेचे उपाध्यक्ष सुनील देवडा, बँकेचे संचालक विठ्ठलदास मुंदडा, शशीकांत दोडल, ज्ञानेश्वर मामडे, राजेश अग्रवाल, संजय देवडा, आशिष काबरा, गजानन देशमुख, एम एम बुद्रुक, आशिष काबरा, अजित बज, राजु मुदीराज, जनकराज खुराणा, डॉ सचिन बगडीया यांची उपस्थिती होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर जालनापुरे, सरव्यवस्थापक शशीकांत कंदी, उप सरव्यवस्थापक सुधीर मुळे, सहा. सरव्यवस्थापक ज्ञानदेव घुगे, सहा सरव्यवस्थापक श्रीराम माळोदे, आरोग्य शिबीर समितीचे नंदकिशोर भालेराव, आशिष पिंगळकर, संजय बोहरा, दयाल यादव यांच्यासह सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्याला बँकेचे ग्राहक, सभासद, ठेवीदार व हिंतचिंतकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, उपाध्यक्ष सुनील देवडा मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर जालनापुरे यांनी केले आहे.

वीज कर्मचाऱ्यांचा पी.एफ. ट्रस्ट धोक्यात!

कल्याण : राज्यातील तिनही वीज कंपन्यांतील किमान नव्वद हजार वीज कर्मचाऱ्यांचा स्वतंत्र चालविला जाणारा तेरा हजार कोटीचा पी. एफ. ट्रस्ट भ्रष्ट विश्वास्तांमुळे धोक्यात आला आहे. मितीला सदर ट्रस्ट चा तोटा हा जवळपास दोन हजार कोटीच्या घरात असून, तो दिवसेंदिवस वाढत आहे, त्यामुळे वीज कंपन्यांतील नव्वद हजार वीज कर्मचाऱ्यांची कुटुंबे उघड्यावर पडण्याच्या भीतीने हवालदिल झाली आहेत.

महिना अखेर पगारापोटी कपात होऊन येणारी पी.एफ. ची रक्कम ही योग्य व आर.पी.एफ.सी. च्या नियमात बसणाऱ्या सक्षम वित्तीय संस्थेत न गुंतवल्याने हा तोटा होत आहे. याला वीज प्रशासन व सहा वीज कामगार संघटनांचे मनमानी गुंतवणूक करणारे विश्वस्त जबाबदार आहेत. या विश्वस्तांनी जाणून बुजून केलेल्या अक्षम्य चूकीमुळे हे संकट उभे राहिले आहे.

मुख्यमंत्री कार्यालयावर हल्ला करण्याची धमकी

पाकिस्तानी नंबरवरून मुंबई पोलिसांना मेसेज

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गाडीला बॉम्बने उडवण्याची धमकी दिल्यानंतर आता मुंबईतील मंत्रालयात असलेल्या मुख्यमंत्री कार्यालयावर हल्ला करण्याची धमकी देणारा मेसेज मुंबई वाहतूक पोलिसांना आला आहे. हा मेसेज मुंबई वाहतूक पोलिसांना व्हाट्सअँपवर पाठवण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणात वरळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपासाला सुरुवात केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका पाकिस्तानी नंबरवरून मुंबई वाहतूक पोलिसांना व्हाट्सअँपवर बुधवारी (दि. २६) दुपारी हा धमकीचा मेसेज आला होता. हा मेसेज आल्यानंतर पोलीस यंत्रणा अलर्ट मोडवर आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. धमकीचा मेसेज करणाऱ्या व्यक्तीने त्याचं नाव मालिक शहाबाज हुमायून राजा देव असं सांगितलं आहे. लवकरच या व्यक्तीला अटक केली जाईल असं पोलिसांनी सांगितले आहे.

उपमुख्यमंत्र्यांना बॉम्ब हल्ल्याची धमकी दिल्यानंतर काही दिवसांनी मुख्यमंत्री कार्यालयावर हल्ला करण्याची धमकी आली आहे. त्यामुळे पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. लवकरच धमकीचा मेसेज पाठवणाऱ्याचा शोध घेतला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते धुळ्याचे सीईओ विशाल नरवाडे यांचा गौरव

धुळे : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार राज्यात १०० दिवसांचा कृति आराखडा तयार करण्यात आला आहे. या १०० दिवस कृती आराखड्याची धुळे जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी या आराखड्यातंर्गत राबविलेल्या विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांबद्दल ते राज्यातील उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी ठरले असून याबद्दल त्यांचा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार राज्यात राबविण्यात येत असलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या अंमलबजावणीची आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी राज्यातील १५ विविध विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदांमध्ये या आराखड्यातंर्गत सुरु असलेल्या उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये जिल्हा परिषद गटात सादरीकरणाची संधी धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी मिळाली. नरवाडे यांनी केलेल्या कामकाजाचे उत्कृष्ट सादरीकरण केल्याने ते राजयातील उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी ठरले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या सादरीकरणात राज्य शासनाने ठरवून दिलेल्या सात कलमी कार्यक्रमाबरोबरच विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण नरवाडे यांनी केले. जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ तयार करण्यात धुळे जिल्हा परिषद राज्यात चौथ्या तर नाशिक विभागात प्रथम क्रमांकावर आहे. यामुळे ग्रामविकास विभागाच्या ७ सेवा ऑनलाईन प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. सुकर जीवनमान अतंर्गत सेवांचीर पोहोच सुनिश्चित करण्यासाठी आणि ग्रामीण भागात राहणीमान सुलभ करण्यासाठी ९ उपक्रम राबविण्यात येत आहे. कार्यालयीन स्वच्छता उपक्रमातंर्गत स्वच्छतेची पंचसुत्री तयार करण्यात येऊन जुन्या निरुपयोगी वस्तुंची विल्हेवाट लावण्यात आली आहे. तक्रार निवारण उपक्रमातंर्गत आपले सरकार पोर्टलवरील ३४९ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

अभ्यागत भेटीचे नियोजन, नागरीकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचबरोबर कार्यालयीन सोईसुविधा उपक्रमातंर्गत कार्यालयाच्या आवारात स्वच्छ पिणयचे पाणी, स्वच्छ प्रसाधनगृह, सुसज्ज प्रतिक्षालय, प्रथमोपचार पेटी, दिव्यांग अभ्यागतांसाठी व्हीलचेअर, कार्यालयाचे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी उपक्रमातंर्गत आठवड्यातून किमान २ दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन पाहणी करण्यात येत आहे. प्रशासकीय कामकाजात १ जानेवारीपासून ई- ऑफिस प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. यामुळे कामकाजास गती आली आहे. आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन उपक्रमातंर्गत उद्योगांना पोषक वातावरण तयार करण्यात येत आहे. त्यासाठी लागणाऱ्या परवानग्या, नोंदणी, कर भरण्याची सुलभता पध्दत सोपी करण्यात आली आहे. अधिकारी, कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी व कृत्रिम बुध्दीमत्ता व तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात आला आहे.

याशिवाय नाविण्यपूर्ण उपक्रमात घरकुल लाभार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यास प्राधान्य देण्यात येत असल्याने काम पूर्णत्वास गती आली आहे. शिवाय कॉपी मुक्त अभियानाचा धुळे पॅटर्न राज्यभरात नावारुपास येत असून या उपक्रमाचे शिक्षणमंत्री, मुख्य सचिव तसेच शिक्षण आयुक्त यांनीही कौतुक केले आहे.या विविध उपक्रमांसोबतच पुढील उर्वरित दिवसांचे उत्कृष्ट नियोजन आदिंचे अतिशय उत्कृष्ट सादरीकरण नरवाडे यांनी सादर केल्याने ते उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी ठरले आहे. याबद्दल जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्यासह जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांनीही त्यांचे कौतुक केले.

पाकिस्तानमध्ये मशिदीत स्फोट; पाच ठार

नौशेरा : पाकिस्तानच्या वायव्य भागातील खैबर पख्तूनख्वा प्रांतातील नौशेरातल्या अखोरा खट्टक भागात शुक्रवारचा नमाज सुरू असताना मशिदीत स्फोट झाला. या स्फोटामुळे पाच जणांचा मृत्यू झाला आणि २० जण जखमी झाले. मशिदीतील मुख्य सभागृहात स्फोट झाला. यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली.

प्राथमिक माहितीनुसार आत्मघाती हल्ला करुन मशिदीत स्फोट करण्यात आला. या स्फोटात मौलाना हामिद उल हक हक्कानीचा मृत्यू झाला. हक्कानीया समुहाच्या मशिदी आणि मदरशांचा प्रमुख तसेच भारत विरोधी गटाचा एक महत्त्वाच्या नेता अशी मौलाना हामिद उल हक हक्कानीची ओळख होती. याआधी सॅम्युअल हकची घरातच हत्या करण्यात आली होती. पाठोपाठ त्याचा मुलगा हामिद उल हक हक्कानी हा पण स्फोटात ठार झाला आहे. सॅम्युअल हक हा पाकिस्तानमधील तालिबानचा संस्थापक म्हणून ओळखला जात होता. यामुळे आधी त्याची आणि आता त्याच्या मुलाची हत्या झाल्याने हक्कानी समुहाच्या पाकिस्तानमधील वर्चस्वापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. खैबर पख्तूनख्वाचे पोलिस महानिरीक्षक (आयजी) झुल्फिकार हमीद यांनी हल्ल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. स्फोट प्रकरणी तपास सुरू आहे. सर्व शक्यता आजमावल्या जातील, असे आयजी झुल्फिकार हमीद म्हणाले.

ईपीएफओने कायम ठेवला ८.२५ टक्के व्याजदर

नवी दिल्ली : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने (ईपीएफओ) २०२४-२५ साठी कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीवर ८.२५ टक्के व्याजदर कायम ठेवले आहे. देशातील सुमारे ७ कोटी नोकरदारांसाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे.'ईपीएफओ'ने २०२४-२५ मध्ये २.०५ लाख कोटी रुपयांच्या ५.०८ कोटी दाव्यांवर प्रक्रिया केली. ही संख्या २०२३-२४ मधील ४.४५ कोटी दाव्यांपेक्षा अधिक आहे. २०२३-२४ साठी ८.२५ टक्के व्याजदर हा १.०७ लाख कोटी रुपयांच्या उत्पन्नावर आधारित होता. जो १३ लाख कोटी रुपयांच्या मुळ रकमेवरील आतापर्यंतचा सर्वाधिक आहे. २०२२-२३ मध्ये भविष्य निर्वाह निधीवर ८.१५ टक्के व्याजदर होता, जो ११.०२ लाख कोटी रुपयांच्या मुळ रकमेवर ९१,१५१.६६ कोटींच्या उत्पन्नावर जाहीर करण्यात आला होता. भविष्य निर्वाह निधीच्या व्याजदरांत चढ-उतार दिसून आले आहेत. २०१८-१९ मध्ये ८.६५ टक्के, २०१९-२० मध्ये ८.५ टक्के आणि २०२१-२२ मध्ये ८.१ टक्के व्याजदर राहिला असून त्यात घसरणीचा कल दिसून आला. ईपीएफचा सर्वाधिक व्याजदर २०१५-१६ मध्ये ८.८ टक्के आणि २०१३-१४ आणि २०१४-१५ मध्ये ८.७५ टक्के एवढा होता.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त नव्या चित्रपट आणि वेब सिरीजची घोषणा...

मुंबई : अल्ट्रा झकास या मराठीतील आघाडीच्या ओटीटी प्लॅटफॉर्मतर्फे मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने नवा कंटेंट सादर करत मराठी चित्रपटसृष्टीच्या समृद्ध वारशाला अभिवादन करण्यात येत आहे. प्रादेशिक मनोरंजनाचा वसा पुढे नेत, अल्ट्रा झकास सातत्याने उत्तम दर्जाचे चित्रपट, वेब सीरिज आणि एक्स्क्लुझिव्ह ओरिजिनल्स जगभरातील प्रेक्षकांसाठी उपलब्ध करून देत आहे. अल्ट्रा झकास : मराठी मनोरंजनासाठी विकसित होत असलेले केंद्र स्थापनेपासूनच अल्ट्रा झकास मराठी मनोरंजनासाठी प्रेक्षकांचे आवडते ठिकाण झाले आहे. या प्लॅटफॉर्मचा वापर करणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढतच आहे आणि प्रेक्षक या प्लॅटफॉर्मवर खिळून राहतात. या प्लॅटफॉर्म चित्रपट किंवा वेब सीरिज पूर्ण पाहण्याचा दर ८०% आहे. त्यामुळे अल्ट्रा झकासने प्रादेशिक ओटीटी क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे.

शक्ती ग्रुपकडून रिन्यूएबल एनर्जी क्षेत्रात १७०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची घोषणा

मुंबई – सौर पंप आणि मोटर्सची आघाडीची उत्पादक आणि पुरवठादार शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेडने आज मध्य प्रदेशात १७०० कोटी रुपयांच्या महत्त्वपूर्ण गुंतवणुकीची घोषणा केली. पिथमपूरमधील सुमारे ६४ हेक्टर औद्योगिक जमिनीवर होणाऱ्या या विस्तारामुळे रिन्यूएबल एनर्जी सोलर वेफ़र सेसोलर सेल, सोलरपंपिंग सिस्टम आणि इलेक्ट्रिक वाहन घटकांसाठी अत्याधुनिक उत्पादन युनिट्सची स्थापना होईल, ज्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतील. या प्रकल्पांमध्ये उत्पादन सुरू झाल्यानंतर, शक्ती पंप ही देशातील पहिली कंपनी असेल जी पंप, मोटर्स, सौर पॅनेल, स्ट्रक्चर्स, व्हीएफडी, इन्व्हर्टर इत्यादी सौर पंपिंग उद्योगाच्या सर्व गरजा पूर्ण करण्याची क्षमता ठेवेल. १९८२ मध्ये स्थापित, शक्ती पंप्सचा भारतीय बाजारपेठेत ४० वर्षांहून अधिक काळाचा समृद्ध वारसा आहे. कंपनी वेगवेगळ्या गरजा पूर्ण करण्यासाठी घरगुती, कृषी, औद्योगिक, सौर आणि सांडपाणी पंपांसह विस्तृत श्रेणीतील पंप ऑफर करते.

'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे भव्य 'चेन आणि बँगल्स महोत्सवा'ला सुरुवात

छत्रपती संभाजीनगर– दागिने विश्वात उत्कृष्ट कारागिरीसाठी आणि विश्वासाहर्ता टिकवून ठेवणाऱ्या प्रसिद्ध 'पीएनजी ज्वेलर्स'ने आपल्या ग्राहकांसाठी बहुप्रतीक्षित 'चेन आणि बँगल्स महोत्सवा'ची सुरुवात केली आहे. या अनोख्या उत्सवात सोन्याच्या चेन आणि बांगड्यांचे एक सुंदर कलेक्शन सादर करण्यात येणार आहे. मर्यादित कालावधीसाठी असलेला हा विशेष महोत्सव 'पीएनजी ज्वेलर्स'च्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध असेल आणि स्टॉक संपेपर्यंत सुरू राहील. या महोत्सवाच्या निमित्ताने ग्राहकांना आकर्षक किंमतीत भव्य आणि विविध प्रकारच्या डिझाइन्समध्ये दागिने खरेदी करण्याचा अनोखा अनुभव घेता येणार आहे.

विद्यार्थी आणि शिक्षकांना संगणक विज्ञान शिक्षण उपलब्ध

मुंबई : राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी संगणक विज्ञान शिक्षण सहज उपलब्ध करून देण्याच्या आपल्या बांधिलकीला अधिक बळकटी देत अमेझॉन इंडिया ने आज महाराष्ट्रात अमेझॉन फ्युचर इंजिनिअर प्रोग्रामचा विस्तार जाहीर केला. याआधी सुमारे ६००० विद्यार्थी आणि ७००० शिक्षकांपर्यंत पोहोचणाऱ्या या प्रोग्रामचा आता विस्तार करून १८ जिल्ह्यांमध्ये ११,००० हून अधिक विद्यार्थी आणि १३,००० शिक्षकांपर्यंत हा उपक्रम पोहोचला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही मोठी वाढ आहे. या जिल्ह्यांमध्ये अहमदनगर, अमरावती, औरंगाबाद, बीड, चंद्रपूर, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नांदेड, नाशिक, पुणे, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर आणि ठाणे यांचा समावेश आहे.

भारताची स्ट्रीट-स्मार्ट ईव्ही आता झाली आणखी स्टायलिश

मुंबई – जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडिया, देशातील आघाडीची इलेक्ट्रिक कार निर्माता कंपनी, यांनी कॉमेट ईव्ही पोर्टफोलिओमध्ये ब्लॅकस्टॉर्म एडिशन सादर केली आहे, ज्यामुळे भारताच्या स्ट्रीट-स्मार्ट ईव्ही ला अधिक स्टाईल आणि आकर्षण मिळाले आहे. कॉमेट ब्लॅकस्टॉर्म टॉप व्हेरियंट म्हणून एक्स-शोरूम किंमत ७.८०ङ रुपए + बैटरी रेंटल २.५ रुपए/किमी. रूपयांमध्ये लॉन्च करण्यात आली आहे. स्टायलिश आणि तंत्रज्ञानाने परिपूर्ण शहरातील प्रवासासाठी उत्कृष्ट पर्याय शोधणारे ग्राहक आता आपल्या जवळच्या एमजी डिलरशिपला भेट देऊन नवीन एमजी कॉमेट ब्लॅकस्टॉर्म बुक करू शकतात. बुकिंगसाठी ११,००० रूपये भरावे लागतील.

विशेष यकृत आणि गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी ओपीडी सेवा सुरु

नाशिक : नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई यांच्या वतीने प्रौढ आणि बाल यकृत तसेच गॅस्ट्रोएन्टेरोलॉजीसाठी विशेष ओपीडी सेवा नाशिकमध्ये सुरू करण्यात आली आहे. याचा उद्देश यकृताशी संबंधित आजारांवर तज्ञांचा सल्ला आणि अद्ययावत उपचार उपलब्ध करून देणे हा आहे, जेणेकरून रुग्णांना वेळेत निदान आणि विशेष उपचार मिळू शकतील.ही नवीन ओपीडी सेवा नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या हिपॅटो-पॅंक्रियाटिक-बायलीरी आणि गॅस्ट्रोइन्टेस्टाइनल विशेषज्ञांच्या तज्ञ पथकाद्वारे घेतली जाईल. प्रत्येक महिन्याच्या मंगळवार आणि बुधवार या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत नाईन पर्ल्स हॉस्पिटल (वल्लभ नगर), स्पार्क डायग्नोस्टिक्स (तिडके कॉलनी), आणि मेडिलिव्ह मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल (द्वारका) येथे या सेवा उपलब्ध असतील

कोमल व पोषणयुक्त केसांसाठी या डीआयवाय हेअर मास्कने उन्हाळ्यातील उष्णतेवर मात करा

नाशिक – उन्हाळा जवळ आला आहे. या दिवसांतील कडक उन्हामुळे केसांमधील ओलावा कमी होऊ शकतो. त्यामुळे केस कोरडे, रूक्ष होतात आणि ते नीटनेटके राहत नाहीत. संपूर्ण उन्हाळ्यात आपले केस आरोग्यदायी राहावेत, ते कोरडे पडू नयेत यासाठी योग्य घटक वापरून केसांचे पोषण करणे आवश्यक आहे. कोरफड व नारळाचे तेल यांचे मिश्रण हे याबाबतीत परिपूर्ण आहे. ते केसांमधील ओलावा कायम ठेवते, केस मजबूत करते आणि उन्हाळ्यात होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण करते. हे फायदे मिळवण्यासाठी विनासायास आणि गुणकारी उपाय शोधत असाल तर पॅराशूट ॲडव्हान्स्ड ॲलोवेरा एनरिच्ड कोकोनट हेअर ऑईल हे उत्पादन अगदी सुयोग्य आहे. कोरफडीच्या व नारळाच्या गुणांनी समृद्ध असलेले हे हलके, चिकट नसलेले उत्पादन आहे. याचा फॉर्म्युला केसांना उत्तम पोषण देतो. त्यामुळे केस संपूर्ण उन्हाळ्यात कोमल राहतात आणि त्यांची विशेष काळजी घेण्याची गरज भासत नाही.

सनफीस्ट डार्क फँटसीचे 'बिगफँटसीज स्पेसशिप

मुंबई: बेंगळुरू,चेन्नईआणि हैदराबादसह दक्षिण भारतातील प्रमुखशहरांमध्ये यशस्वी प्रवास केल्यानंतर,सनफीस्टडार्क फँटसी चे प्रसिद्ध फँटसी स्पेसशिप आता२८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने मुंबईत आले आहे.ब्रँडच्या नाविन्यपूर्ण कॅम्पेनच्या बिगफँटसीज: आपल्या कल्पनांना पंख द्या अंतर्गत,हे स्पेसशिप कला आणितंत्रज्ञानाच्या साहाय्याने मुलांच्या सर्जनशीलतेला आणि कल्पनाशक्तीला नवे आयामदेण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहे.शहरातीलमुलांना २ मार्च २०२५ पर्यंतनेहरू साइंस सेंटर मध्येस्थिर असलेल्या फँटसी स्पेसशिपचा अनोखा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या या विशेष बसमध्ये मोठ्या इंटरॅक्टिव्हस्क्रीन बसवण्यात आल्या आहेत, ज्यामुलांनी हाताने काढलेल्या चित्रांना त्यांची मूळ आकर्षकता कायम ठेवत जिवंत डिजिटलकलाकृतींमध्ये रूपांतरित करतात. एकदा स्कॅन केल्यावर,त्यांची चित्रे डिजिटल ३डीइंटरॅक्टिव्ह कॅरेक्टर्समध्ये बदलली जातात आणि फँटसी स्पेसशिपच्या आत मोठ्याटच-इनेबल्ड स्क्रीनवर प्रदर्शित केली जातात.

बसस्थानकात प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना चांगल्या सुविधा द्या : पालकमंत्री

अहिल्यानगर दि.२७- राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत राज्य परिवहन महामंडळाच्या जिल्ह्यातील कामकाजाचा आढावा घेतला.बसस्थानकात प्रवासी, चालक आणि वाहकांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करावा, सुरक्षेच्यादृष्टीने सर्व स्थानकांना भेटी देऊन आढावा घ्यावा आणि सीसीटीव्हीद्वारे प्रभावी नियंत्रण ठेवावे, असे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीस अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, अपर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे, प्रादेशिक व्यवस्थापक, अमृता ताम्हणकर, विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे, विनायक देशमुख आदी उपस्थित होते.

मंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, बसस्थानकात रात्रीच्या वेळी प्रकाश राहील याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे, त्यासाठी सौर ऊर्जेचा वापर करावा. स्थानक परिसरातील स्वच्छतागृहांची देखभाल आणि स्वच्छतेसाठी अनुभवी संस्थेची नेमणूक करावी. बसस्थानकात प्रवाशांना तक्रार करण्यासाठी दूरध्वनी क्रमांक प्रदर्शित करावा.

बस स्थानकाचे काम करतांना नावीन्यपूर्ण कल्पना अंमलात आणाव्या, प्रवाशांना चांगली सुविधा देण्यासोबत महामंडळाचे उत्पन्न वाढविण्यासाठी नव्या स्थानकाचे काम करतांना बीओटी तत्वावर सुधारित प्रस्ताव तयार करावा. बसस्थानक परिसरात अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी. चालक आणि वाहकांना विश्रांतीसाठी चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करावा.

जिल्हा मुख्यालय ते तालुका मुख्यालय प्रायोगिक तत्वावर विना थांबा गाड्या सोडाव्यात. ग्रामीण भागासाठी जनता गाड्या सुरू ठेवाव्यात. एसटी बसेसमध्ये स्वच्छता ठेवावी. नवीन एसटी बसेसचा प्रस्ताव सादर करावा. बस थांब्यावर दिलेल्या अटी शर्तीचे पालन होण्याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे, अशा ठिकाणी असलेल्या सुविधांचे फलक आणि तक्रारीसाठी क्रमांक प्रदर्शित करावे, अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या.

यावेळी जिल्ह्यातील बसस्थानकांच्या नूतनीकरण कामांचा आढावा घेण्यात आला.

धनकनकेश्वर महादेव मंदिर संस्थेच्या वतीने गजानन आवारे यांना पुरस्कार देऊन गौरव

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २८ फेब्रुवारी पैठण तालुक्यातील धनकनकेश्वर महादेव मंदिर येथे महाशिवरात्री महोत्सव २०२५ निमित्ताने या संस्थानच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला या मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे पैठण तालुकाध्यक्ष तथा पत्रकार गजानन आवारे यांना शोध पत्रकारिता पुरस्कार यावेळी छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास भुमरे यांच्या हस्ते देण्यात आला.याप्रसंगी बोलताना खासदार संदीपान भुमरे म्हणाले की धनकनकेश्वर महादेव मंदिर संस्थान एमआयडीसी पैठण मुधलवाडी यांनी धार्मिक कार्यक्रमासह समाजातील विविध दहा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा गुणगौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले हा एक अनोखा उपक्रम संस्थानने राबवला असून यामुळे समाजात निस्वार्थपणे काम करण्याचा गौरव केल्यामुळे त्यांना आणखी कार्य करण्याची प्रेरणा मिळाले तसेच उपक्रम राबविल्या बदल संस्थानचे प्रकाश लबडे सह त्यांच्या सहकाऱ्याचे अभिनंदन केले यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख आण्णासाहेब लबडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख विनोद बोंबले, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख पुष्पा गव्हाणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक भाऊ लबडे, खरेदी विक्री संघाचे संचालक अंकुश बोबडे,माजी सरपंच अमोल गोर्डे, उद्योजक सुयोग भोसले, सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे, पोलिस उपनिरीक्षक संभाजीराव झिंजुर्डे, पोलिस जमादार गणेश खंडागळे, कृष्णा उगले, बंडू आढाव,गवळी सह आदी उपस्थित होते.

पत्र सृष्टीचे ईश्वर.....श्री गुरुजी अभिवाचन कार्यक्रम संपन्न

तभा वृत्तसेवा

पुणे : केशव माधव न्यास व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सह्याद्री प्रभात शाखा कर्वेनगर आयोजित ✻पत्र सृष्टीचे ईश्वर श्री गुरुजी✻ हा अभिवाचन कार्यक्रम नुकताच कर्वेनगर येथील कांचन दाते यांच्या निवासस्थानी संपन्न झाला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक पूजनीय माधव सदाशिव गोळवलकर उपाख्य श्री गुरुजी यांच्या जयंतीदिनानिमित्त संपूर्ण देशभर त्यांच्या पत्र रुपी आठवणी व कार्याची माहिती व्हावी यासाठी अनेक ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आले.श्रीगुरुजी यांनी हजारो पत्र लिहून अनेक कार्यकर्ते जोडले.समाजाला दिशा दिली. संपूर्ण भारतभर प्रवास केला व संघ कार्य अफाट वाढवले ह्याचे सादरीकरण अभिवाचन द्वारे करण्यात आले.प्रसिद्ध नाट्यकर्मी कुलदीप धुमाळे,डॉ ओंकार धुमाळे व सेवा आरोग्य फाऊंडेशन चे संचालक डॉ सतीश जोशी यांनी त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमध्ये श्री गुरुजी यांच्या पत्रलेखन कार्य सादर केले.डॉ.ओंकार धुमाळे ह्यांनी चाहिए आशिष माधव,नम्र गुरुवर्य प्रार्थना हे गीत सादर केले.ह्या नाट्य संहितेचे लेखक,दिग्दर्शन कुलदीप धुमाळे हे आहेत.राष्ट्रीय स्वयंसेवक संघ – जनकल्याण समितीचे विनायक डंबीर यांनी श्री गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून उद्घाटन केले.उद्घाटनपर भाषणात विनायक डंबीर म्हणाले श्री गुरुजींनी पंतप्रधानापासून ते स्वयंसेवकांपर्यंत आपल्या अनेक पत्रलेखन द्वारे माणूस जोडण्याचे व समाजाला दिशा देण्याचे कार्य केले.श्रीगुरुजी हे ज्ञानी होते पण त्याचा अहंकार कधी केला नाही. ते साधक होते पण कसलेही कर्मकांड त्यांनी केले नाही.ते अफाट बुद्धिवैभवाचे धनी होते पण त्याचे प्रदर्शन त्यांनी केले नाही.असेही डंबीर यांनी प्रतिपादन केले.केशव माधव न्यासचे सचिव अरविंद देशपांडे यांनी प्रास्ताविक केले व उपस्थितांचे स्वागत केले. विश्वस्त प्रकाश देशपांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचलन केले.

कार्यक्रमास केशव माधव न्यास चे पदाधिकारी,संघ स्वयंसेवक,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बिडकीन येथील ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २८ फेब्रुवारी : राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये विद्यार्थ्यांसाठी शालेय स्तरावरील विज्ञान प्रदर्शन शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी पार पडले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून शासकीय तंत्रनिकेतन छत्रपति संभाजीनगर येथिल माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे चे माजी प्रमुख अप्पासाहेब अबक, शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला, शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अप्पासाहेब अबक यांच्या हस्ते दिपप्रज्वलन आणि सरस्वती पुजनाने झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेच्या विज्ञान शिक्षिका काजल देशमुख यांनी केले. या विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला आणि चिकित्सक वृत्तीला चालना मिळते तसेच दैनंदिन जिवनात विज्ञानाचा उपयोग कसा होतो या विषयी प्रमुख पाहुणे अप्पासाहेब अबक यांनी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर शाळेचे संस्थापक अध्यक्ष व सतिश तोतला, शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला यांनी हि विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शाळेतील विज्ञान शिक्षिका काजल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली चौथी ते आठवीतील विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोगकृती सादर केल्या.यामध्ये रेन डिटेक्टर, अर्थक्वेक डिटेक्टर, ड्रिप इरिगेशन, विंडमिल, ऑर्गेनिक इंटीग्रेटेड फार्मिंग, होलोग्राम, स्मार्ट एग्रीकल्चर, युजिंग सोलर पैनल, एसिड रेन, वॉटर अलार्म, ग्रीनहाउस फार्मिंग, वॉटर साइकिल, एयर पॉल्युशन वर्किंग मॉडल, वॉटर हिटर, हार्ट वर्किंग मॉडल इ. प्रयोगकृतींचा समावेश होता. मान्यवर आणि पालकांनी या वैज्ञानिक प्रयोगांना भेट देऊन त्याची माहिती जाणून घेतली व विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रयोगकृती पाहून बालवैज्ञानिकांचे कौतुक केले. विज्ञान प्रदर्शनात उत्कृष्ट प्रयोगकृती सादर केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक जाहिर करण्यात आले. यामध्ये प्रथम पारितोषिक विजेते: ऑर्गेनिक इंटीग्रेटेड फार्मिंग (सहभागी विद्यार्थी: वेदिका धर्मे) द्वितीय पारितोषिक विजेते: वॉटर साइकिल (सहभागी विद्यार्थी: श्री हाडे) तृतीय पारितोषिक विजेते: विंडमिल (सहभागी विद्यार्थी: किरण गढिकर, नैतिक तोडकर, तनिष तोतला) हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद संपन्न

सोयगाव,दि.२८ फेब्रुवारी : येथील अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्यावतीने दि.२७ गुरुवार रोजी रसायन व जैव-रसायनशास्त्रातील सद्यकालीन संशोधनात्मक विकास याविषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्राचे प्राध्यापक प्रोफेसर डॉ.एम.के.लांडे यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन करण्यात आले.तर आयआयटी जोधपूर येथील शास्त्रज्ञ व सहयोगी प्रध्यापक डॉ.रोहन एरंडे व डॉ.बी.एम.कृष्णा मरीसेरला,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्राचे प्राध्यापक व शास्त्रज्ञ डॉ. भास्कर साठे,डॉ.बी.के मगर,डॉ.अजय पाटील यांनी परिषदेच्या अनुषंगाने सहभागी संशोधक,प्राध्यापक व विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले.

अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे यांचे या परिषदेसाठी विशेष सहकार्य लाभले. या परिषदेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,रसायनशास्त्राचे विभागप्रमुख व संयोजक डॉ.रामेश्वर मगर,डॉ. सुनील चौधरे, डॉ.संतोष पडघन,डॉ.मनोजकुमार चोपडे,डॉ.पंकज गावित, प्रा.शाम टकले,कनिष्ठ विभागप्रमुख डॉ.उल्हास पाटील, अधिक्षक पंकज साबळे यांच्यासह महाविद्यालयातील इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

सामान्य माणूस जो पर्यन्त मराठीतून बोलत राहील,तो पर्यन्त मराठी भाषेला धोका नाही : डॉ.संतोष तांदळे

सोयगाव,दि.२८ फेब्रुवारी : ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी साहित्यिक वि.वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांच्या जयंतीच्या निमित्ताने २७ फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिन संत ज्ञानेश्वर, महाविद्यालयात मराठी विभागाद्वारे साजरा करण्यात आला.डॉ.संतोष तांदळे पुढे बोलताना म्हणाले की महाराष्ट्रातला ग्रामीण सर्वसामान्य माणूस जोपर्यंत मराठी बोलतो तोपर्यंत मराठी भाषेला धोका नाही.सर्वसामान्य माणूस हा समृद्ध मराठी बोलतो.त्याच्याकडे मराठीतील शब्दांचे भंडार आहे.रोजच्या दैनंदिन जीवनात तो प्रमाणभाषे पेक्षा बोली भाषेत अधिक बोलत असतो हे एका अर्थाने मराठी भाषा संवर्धनाचे काम करत असतो. डॉ. तांदळे पुढे बोलताना म्हणाले की नुकताच केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे. यामुळे देशभरातल्या ४५० विद्यापीठांमध्ये मराठी भाषा शिकवण्याची सुविधा उपलब्ध केली जाऊ शकते. राज्यातील १२००० ग्रंथालयासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे या निर्णयामुळे सर्व ग्रंथालयाचे सशक्तीकरण होणार आहे.मराठी भाषेच्या उत्कर्षासाठी मराठी भाषा जपण्यासाठी तिच्या संवर्धनासाठी काम करणारे संस्था व्यक्ती आणि विद्यार्थ्यांना यामुळे मोठी मदत मिळू शकते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ.भास्कर साठे, (डॉ.बा. आ.म.विद्यापीठातील)हे उपस्थित होते.डॉ.भास्कर साठे यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी इंग्रजी अभ्यासक्रमातील पुस्तके मराठी भाषेतून येत गेल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लागण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक मराठी विभाग प्रमुख, डॉ.दिलीप बिरुटे यांनी केले.त्यांनी मराठी भाषेचं संवर्धन आणि गौरव करणं हे या दिवसाचं मुख्य औचित्य होतं हे सांगून कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना उजाळा दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी अध्यक्षीय समारोपात मराठी भाषेची महती तसेच तिचे स्वयंभूपण, प्राचीन वारसा याबाबत आपले विवेचन केले.व्यासपीठावर विचारपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य रावसाहेब बारोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ज्योती स्वामी यांनी केले तर आभार डॉ.रमेश औताडे यांनी मांडले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

अहिल्यानगर दि.२७- मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी भाषेच्या प्रसारासाठी ग्रंथ प्रदर्शनासारखे उपक्रम उपयुक्त असल्याचे सांगून त्यांनी जिल्हावासियांना मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, निवासी उपजिल्हाधिकारी शाहुराज मोरे, तहसिलदार शरद घोरपडे, विनायक देशमुख आदी उपस्थित होते. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी व्यवहारात मायबोली मराठीचा वापर अधिकाधिक होणे आणि विविध क्षेत्रातील ज्ञान मराठी पुस्तकांच्या माध्यमातून पोहोचविले जाणे आवश्यक असल्याचे मतही पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केले.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त निवासी उपजिल्हाधिकारी शाहुराज मोरे यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मराठी भाषेच्या संवर्धन आणि विकासासाठी भाषेचा व्यवहारात उपयोग करणे आणि इतर भाषांमधील शब्द मराठीत आणणे आवश्यक असल्याचे मत श्री. मोरे यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाला मराठी भाषा समितीचे सदस्य किशोर मरकड, पत्रकार अशोक निंबाळकर, उपजिल्हाधिकारी अरुण उंडे, भारती सगरे, जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बढे, तहसिलदार शरद घोरपडे, डॉ.अमोल बागुल आदी उपस्थित होते.

मराठी उद्योजकांनी निर्यात क्षेत्रातील संधींचा फायदा वेळीच घ्यावा – डॉ.धनंजय दातार

छत्रपती संभाजीनगर, २८ फेब्रुवारी २०२५ – भारताची निर्यात गेल्या दशकभरात विक्रमी वाढून तिहासिक उच्चांकी पातळीला पोचली आहे आणि पुढील दशकातही हा वेग टिकून राहण्याची चिन्हे आहेत. भारतात व विशेषतः महाराष्ट्रात निर्यातीस अनुकूल अशा महत्त्वाच्या घडामोडी घडत असून त्या संधींचा फायदा मराठी व्यावसायिक व उद्योजकांनी वेळीच घ्यावा, असे आवाहन दुबईस्थित 'अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी नुकतेच येथे केले.

'मिती ग्रुप'तर्फे आयोजित 'महाराष्ट्र बिझनेस एन्क्लेव्ह २०२५' परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या यशस्वी उपक्रमाचे हे तिसरे वर्ष आहे. माटुंग्यातील 'वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट'मध्ये झालेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील उद्योग-व्यवसाय क्षेत्रातील नामवंत तसेच नवउद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय अर्थव्यवस्था पुढील दोन-तीन वर्षांत ५ लाख कोटी रुपये उलाढालीची करण्याचे उद्दिष्ट असून त्यात निर्यातीचा महत्त्वाचा वाटा असेल, असे सांगून डॉ. दातार म्हणाले, सरकारने निर्यातदारांना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी योजना सुरू केल्या आहेत. नवे परकी व्यापार धोरण अस्तित्वात आले आहे. उद्योग-व्यवसाय-व्यापार यासाठी गरजेच्या पायाभूत सुविधांचा दहा वर्षांपूर्वी हाती घेतलेला विकास पूर्णत्वाच्या टप्प्यावर आहे. त्यामुळे वस्तू व सेवांची देशांतर्गत उलाढाल, तसेच परदेशांना निर्यात आगामी काळात अनेकपटींनी वाढणार आहे.

इंडिया-मिडल इस्ट-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉरसारखा (आयएमइइसी) प्रकल्प दशकभरात साकारला तर भारतातून युरोपला होणाऱ्या

निर्यातीचा कालावधी निम्मा होईल आणि खर्चही वाचेल. देशातील डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर (डीएफसी) प्रकल्प पूर्णत्वाच्या टप्प्यात आहे तर महाराष्ट्रात समृद्धी महामार्ग प्रकल्पही पूर्णत्वाच्या टप्प्यात आहे. नवी मुंबई येथे नवा आंतरराष्ट्रीय विमानतळ साकारत आहे. नुकताच जाहीर झालेला वाढवण बंदर व आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प महाराष्ट्राला जागतिक निर्यातीत अग्रेसर बनवणार आहे. हा सर्व विकास येत्या पाच-दहा वर्षांत फलदायी होणार असल्याने मराठी उद्योजकांनी निर्यातीच्या संधी साधायला हव्यात.

ते पुढे म्हणाले, दुबईतील 'जेबेल अली' बंदराची उभारणी, तसेच नवी मुंबईतील 'जेएनपीटी' बंदराची उभारणी झाल्यावर आजूबाजूच्या परिसराचा वेगवान विकास म

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर

एम ए आर जे आय नं.१२२/२०२५
पु.ता. : २९/३/२५

अर्जदार : १) शोभा भ्र. सुरेश चव्हाण, वय ५० वर्षे, धंदा, घरकाम रा. ३-१८-४७६, चुनाभट्टी, फकीरवाडी, गांधी नगर, ता.जि. औरंगाबाद २) अनिता भ्र. हरीभाऊ जगताप, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. गोपाळवाडी ता. वैजापुर जि. औरंगाबाद ३) प्रतिभा भ्र. बालचंद आळंजकर, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम रा. शहापुर ता. जि. औरंगाबाद ४) शांताराम पि. नामदेव क्षीरसागर, वय ४३ वर्षे धंदा शेती रा. मारुती मंदिराजवळ, वडाळी ता. गंगापुर जिं. औरंगाबाद ५) नंदु पि. नामदेव क्षीरसागर, वय ४१ वर्षे धंदा शेती रा. मारुती मंदिराजवळ, वडाळी ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र.१ ते ५ यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. पी.डी. देशपांडे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ५ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी आहे. अर्जदार क्र.१ ते ५ यांचे वडील नामे नामदेव दादा क्षीरसागर हे मौजे वडाळी ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २६/१२/२०२४ रोजी मौजे वडाळी ता. गंगापुर येथे मयत झाले आहे व अर्जदार क्र.१ ते ५ यांची आई नामे सुमनबाई नामदेव क्षीरसागर ह्या दिनांक २४/१०/२०२१ रोजी मयत झालेल्या आहेत व अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत व अर्जदारांनी मयतांचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाशी कोणाचाही काही उजर किंवा आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचा आक्षेप अथवा ऊजर हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात वैयक्तीक किंवा त्यांचे विधिज्ञांमार्फत नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर किंवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांचे विनंती प्रमाणे त्यांच्या हक्कात हेअरशिप प्रमाणपत्र जारी करेल. करीता हे जाहीर प्रगटन आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

दिनांक :- २७/०२/२०२५
कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापूर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर

एम ए आर जे आय नं.१५९/२०२५
पु.ता. २/४/२५

अर्जदार : १) दिपक पि. चंद्रकांत वरकड, वय ३५ वर्षे धंदा शेती व नौकरी रा. कारखाना कॉलनी, रघुनाथनगर ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) रंजना भ्र. चंद्रकांत वरकड, वय ६३ वर्षे धंदा घरकाम रा. जामगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) सौ. छाया रमेश गाढवे, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम रा. रांजणगाव खु., गाढवे वस्ती, ता. राहता जि. अहमदनगर ४) सौ. कोमल भगवान तनपुरे, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम रा. भालगाव ता. नेवासा जि. अहमदनगर ५) सौ. योगिता दिनेश बोडखे, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम रा. प्लॉट नं.२३२, रो-हाऊस नं.४, समृध्दीनगर, एन. अ४, सिडको ता. जि. औरंगाबाद ६) सौ. चित्रावली अमित देशमुख, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. के-५२, बजरंग कॉलनी, बँक ऑफ महाराष्ट्र जवळ, एन-४, सिडको, औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र.१ ते ५ यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. पी.डी. देशपांडे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१, ३ ते ६ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व वहिणी असुन अर्जदार क्र.२ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र.१, ३ ते ६ यांचे वडील व अर्जदार क्र.२ चे पति नामे चंद्रकांत उत्तमराव वरकड हे मौजे जामगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०३/११/२०१९ रोजी मौजे जामगाव ता. गंगापुर येथे मयत झाले आहे व अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत व अर्जदारांनी मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाशी कोणाचाही काही उजर किंवा आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचा आक्षेप अथवा ऊजर हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात वैयक्तीक किंवा त्यांचे विधिज्ञांमार्फत नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर किंवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांचे विनंती प्रमाणे त्यांच्या हक्कात हेअरशिप प्रमाणपत्र जारी करेल. करीता हे जाहीर प्रगटन आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

दिनांक :- २७/०२/२०२५
कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय गंगापूर

जाहीर प्रगटन

मौजे सिरसगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथिल शेतजमीन गट नं. ८८ मधील 0 है, ८३ आर

मला माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन तमाम जनतेस या जादिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी सिरसगाव ता. गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर येथिल शेत जमीन गट नं. ८८ एकुण क्षेत्र ०८ हे. १२ आर या जमीनी पैकी श्री. ललितसिंग विठ्ठलसिंग रा. जि. छत्रपती संभाजीगनर यांच्या मालकी व ताब्यातील संपूर्ण क्षेत्र० हे. ८३ आर जमीन ही कायमस्वरूपी खरेदी करण्याचा करार केला असून सदर जमीनीच्या चर्तु: सिमा पुढील प्रमाणे आहे. पुर्वेस हरिश्चंद्र लांडगे यांची जमीन, पश्चिमेस, संयोगिता ललितसिंग यांची जमीन, दक्षिणेस भीमा बोरुडे यांची जमीन उत्तरेस ताराचंद शामराव लांडगे यांची जमीन,

सदरील जमीन दोषमुक्त व निर्विवाद असल्याची खात्री माझ्या पक्षकाराला दिली आहे. तरी देखील या जाहीर प्रगटाद्वारे तमान जनतेस कळविण्यात येते की, सदर वरील जमीनींशी कोणाचा काही एक हम संबंध, चोळी बांगळी गहाण, दान, बक्षिस, खरेदी-विकी अथवा इतर कुठल्याही मागणी हक्क संबंध असल्यास त्यांनी प्रस्तूतचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कागदपत्रांच्या पुराव्यासह आमच्या नमूद पत्त्यावर आक्षेप नोंदवावा, मूदती आक्षेप न आल्यास माझे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेला आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही करिता हे जाहीर प्रगटन आज दिनांक २८/०२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आले.

दत्तात्रय व्ही. साबणे
९८६००३६४५१

जाहीर प्रगटन

मा. श्रीमती व्ही. एन. काटकर, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : १२९/२०२५
पुढील तारीख: १५/०४/२०२५

अर्जदार १- सिंधुबाई भ्र. संजु उर्फ संजय शिरसे, वय ४५ वर्षे, धंदा शेती/घरकाम, रा. माळीवाडा, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर २- संदीप पिता संजु उर्फ संजय शिरसे, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. माळीवाडा, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर ३- ज्योती पिता संजु उर्फ संजय शिरसे, (लग्ना पुर्वीचे नांव ज्योती भ्र. गणेश सोनवणे (लग्ना नंतरचे नांव वय २७ वर्षे, धंदा शेती/घरकाम, रा. ताडपिंपळगांव, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर.

- विरुध्द -

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर

प्रकरण : कायदेशीर वारसा हक्क प्रमाण पत्र मिळणे बाबत. (Bombay Regulation Act VIII1827, SEC.2)

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. आर. डी. राऊत, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्जदार नंबर १ ही मयत संजय पिता आसाराम शिरसे यांची पत्नी आहे. अर्जदार क्रमांक २ व ३ हे मयत संजयचे अनुक्रमे मुलगा व मुलगी आहे. अर्जदार क्रमांक २ व ३ हे आपसात सख्खे भाऊ बहीण असून अर्जदार क्रमांक १ ही त्यांची जन्मदाती आई आहे. मयतास आई वडील नाही. अर्जदार १ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत या व्यतीरिक्त ईतर कुणीही कायदेशीर अथवा बेकायदेशीर वारस नाही. अर्जदार क्रं. १ चे पती व अर्जदार २ व ३ चे वडील नामे मयत संजय आसाराम शिरसे हे ०८.०१.२०२५. रोजी राहत्या घरी माळीवाडा, कन्नड, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर येथे मरण पावले आहे, त्या बाबतचे मयताचे मृत्यु प्रमाण पत्र दिनांक २२.०१.२०२५ रोजीचे नगर पालिका कन्नड चे मुळ अर्जा सोबत अर्जदारांनी दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ ते ३ यांना मयत संजय आसाराम शिरसे यांच्या मृत्यु पश्चात सरकारी योजनेचा लाभ मिळणे व अत्यावश्यक सरकारी कामासाठी शासनाच्या शासकीय निमशासकीय कार्यालयात दाखल करण्यासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्यामुळे त्या सर्व कागदपत्राची पुर्तता केली आहे, मा. न्यायालयाच्या वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्यामुळे सदरील प्रकरण मा. न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल करण्यास दिनांक १५.०२.२०२५ रोजी कारण घडले आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असून मयत संजय आसाराम शिरसे हे देखील मृत्यु समयी मे. न्यायालयाचे कक्षेतच रहात होते व अंत्य विधी देखील मे. न्यायालयाचे कक्षेतच झालेला आहे. सबब मे. न्यायालयास सदरचा अर्ज चालविण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक २७.०२.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक: २७.०२.२०२५

आदेशोवरुन

लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १०८/२०२५.

अर्जदार : १. वैशाली छोटु गांगुर्डे, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. श्रदधा छोटु गांगुर्डे, वय १२ वर्षे, धंदा शिक्षण, अ. पा. क. म्हणुन अर्जदार क्रं. १. ३. सोमनाथ छोटु गांगुर्डे, वय १४ वर्षे, धंदा शिक्षण, अ. पा. क. म्हणुन अर्जदार क्रं. १. ४. प्रतिक छोटु गांगुर्डे, वय १६ वर्षे, धंदा शिक्षण, अ. पा. क. म्हणुन अर्जदार क्रं. १.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर स्यगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत छोटु नामदेव गांगुर्डे यांचा दिनांक १८/०५/२०१६ रोजी गोंदेगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत छोटु नामदेव गांगुर्डे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २८/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १६/०४/२०२५

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगाव)

जाहीर प्रगटन

मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ९९/२०२५.

अर्जदार : १. साजना प्यारखा तडवी, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. निंबायती, ता.सोयगांव, जि. छ.संभाजीनगर. २. आतीफ प्यारखा तडवी, वय २० वर्षे, धंदा मजूरी, रा. निंबायती, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ३. फरदीन प्यारखा तडवी, वय १८ वर्षे, धंदा मजुरी, रा. निंबायती, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ४. अफताप प्यारखा तडवी, वय १४ वर्षे, अ.पा.क म्हणुन अर्जदार क्रं. १.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अँड. स्वप्निल सुरळकर स्यगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत प्यारखा रमजान तडवी यांचा दिनांक १९/०८/२०२४ रोजी निंबायती येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ वॉरेस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत प्यारखा रमजान तडवी यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २८/०२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ९/०४/२०२५

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगाव)

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे पक्षकार वादी नामे. देवाजी बाळा पन्हाळे रा. देऊळघाट ता. व जि. बुलढाणा ह. मु. सावळबारा ता. सोयगांव जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांनी प्रतीवादी नामे. यतिंद्र डिगंबर खोत व अंजलीबाई यतिंद्र खोत रा. चैतन्यवाडी बुलढाणा ता. व जि. बुलढाणा यांच्या विरुध्द मे. दिवाणी न्यायाधिश (क. स्तर) साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) न्यायालयात नि. दि. दावा नं.:- ७५/२०२२ करार पुर्तता होवुन निरंतर मनाई हुकुमसाठी दावा दाखल केलेला असुन प्रतीवादींनी माझ्या पक्षकाराच्या हक्कात व विश्वासात मौजे देव्हारी ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छ. संभाजीनगर) शिवेतील गट नं. ८१ एकुन क्षेत्रफळ ०६ हे. ४० आर (पो. ख. १३ आर सह) पैकी ०४ हे. २७ आर (एक विहीर सह) विकी करण्याचा करार केलेला असुन किंमत रक्कम रुपये १०,२०,०००/- पैकी बयाना रक्कम रुपये ५,००,०००/- दोन पंचा समक्ष घेवुन व माझ्या पक्षकाराला क्षेत्रफळ ०४ हे. २७ आर चा ताबा देवुन दिनांक :-२७/१०/२००८ ला सौदा पावती माझ्या पक्षकाराच्या हक्कात व विश्वासात करुन दिलेली आहे. प्रतीवादी हे माझ्या पक्षकारास विकी चा करार पुर्व करुन देत नव्हते म्हणुन माझ्या पक्षकाराने प्रतीवादी विरुध्द नि. दि. दावा नं. :- ७५/२०२२ दाखल केलेला असुन पुढिल तारीख : ०३/०३/२०२५ ला आहे. जर वरील वर्णनाच्या वादग्रस्त शेत जमीनीचा बेकायदेशीर प्रतीवादींनी कोनालाही विकी, गहान, दान, बक्षिस किंवा तिस-या व्यक्तीचे हित संबंध निर्माण करनारा कोणताही व्यवहार केला तर त्या बेकायदेशीर व्यवहारास माझा पक्षकार जबाबदार राहनार नाही. करीता सर्व जनतेनी या बाबीची नोंद घ्यावी. करीता सदरचे जाहीर प्रकटन आमच्या मार्फत देण्यात येत असे.

दिनांक :- २८/०२/२०२५.

वादी/आमचा पक्षकार

सदरचे जाहीर प्रकटन आमच्या मार्फत दिले असे,
ॲड. आर. एस. महाजन. मो. नं.:- ९०९६२८३१९८.

संघ हीच जीवनगाथा

अलकः- (५४) नेमबाजी

परमपूजनीय डॉ. हेडगेवारांच्या शिस्त संचलन व नेमबाजी या गोष्टी राष्ट्राचे त्राण टिकवण्यास अत्यंत उपयुक्त आहेत. अशी दृढ धारणा त्या अहिंसेच्या काळात सुद्धा होती. ते अनेकदा त्यांचे मित्र भाऊसाहेब टालाटुले व बाकी मित्र यांच्याबरोबर रानात शिकारीला जात; तेव्हा रानात सुद्धा त्यांचे दोन-तीन दिवसाचे वास्तव्य शिस्तबद्ध तरीसुद्धा एका वास्तव्यात त्यांच्यातील एकाने बंदुकीत काडतुसे भरलेली नसतील अशा कल्पनेने थट्टेने घोडा ओढला व डॉक्टरांच्या अगदी जवळून स्ट्रीकरीत गोळी निघून गेली! या जणू अंगाला घसटून गेलेल्या मृत्यूचे वर्णन करून डॉक्टर सांगत गोळी असो वा नसो पण कोणत्याही व्यक्तीवर थट्टेने नेम करू नये! एका प्रसंगी वान्नेरा येथे झाडाला वांगी टांगून ते टिपण्याच्या शर्यतीत फक्त डॉक्टरांनीच अचूक लक्ष्य टिपून सर्वांना हरवले होते. एकूणच आचार व विचार या दोन्ही बाबतीत नेमबाजी हवी. व ती अचूक असावी असा त्यांचा आग्रह असे. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

जाहीर प्रगटन

मा. श्री. एस. वाय. वाकचौरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर

सिव्हील एम.ए. क्रं. १५४/२०२५ प्रकरणात पुढील ता.१६/०४/२०२५

अर्जदार : -१) खुर्शिदबी भ्र. बशीरखा सय्यद वय ८० वर्षे, धंदा घरकाम रा. सुलतानाबाद, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) हसीना भ्र. निजामोद्दीन सय्यद वय ५८ वर्षे, धंदा घरकाम रा. पोस्ट ऑफीस रोड, बडा तकिया, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) मुन्नाबी भ्र. बाबू शहा वय ५० वर्षे, धंदा घरकाम रा. दिघी, येसगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) आशाबी भ्र. शाबूद्दीन शाहा वय ४२ वर्षे, धंदा घरकाम रा. दिघी, येसगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ५) भैय्याशा पिता बशीरशा सय्यद वय ४८ वर्षे, धंदा मजूरी रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ६) रूकसाना भ्र. सुभान सय्यद वय ४६ वर्षे, धंदा घरकाम रा. मु. सारळा, पोस्ट हरीगांव, ता. जि. अहमदनगर ७) हामीद पिता बशीरशा सय्यद वय ३६ वर्षे, धंदा घरकामे रा. सुलतानाबाद, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ८) महेमुद पिता बशीरशा सय्यद वय ३५ वर्षे, धंदा मजूरी रा. मु. सुलतानाबाद, पो. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ९) अफसाना भ्र. हनीफ शाहा वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा. नाईकवाडी गल्ली, वैजापूर, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ९ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ ही अर्जदार क्रं. २ ते ९ यांची आई असून अर्जदार क्रं. २ ते ९ हे आपसात सख्खे भाऊ विवाहीत बहिणी आहे. अर्जदार क्रं. १ चे पती व अर्जदार क्रं. २ ते ९ यांचे वडील नामे बशीरशा गुलाबशा सय्यद हे दिनांक २७/०१/२०२१ रोजी मौजे सुलतानाबाद, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. त्यामुळे मयत बशीरशा गुलाबशा सय्यद यांना अर्जदार क्रं. १ ही पत्नी व अर्जदार क्रं. २ ते ४, ६ व ९ ह्या विवाहीत मुली व अर्जदार क्र. ५, ७ व ८ हे मुले या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र. १ ते ९ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत बशीरशा गुलाबशा सय्यद यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक २८/०२/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

दि.२८/०२/२०२५

जाहीर प्रगटन

(मौजे आंबेवाडी ता. गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर येथिल शेतजमीन गट नं. ५८ मधील १ हे. १८.२५ आर क्षेत्र)

माझे पक्षकार श्री. भूषण भोनाजी पहुरकर रा.छ. संभाजीनगर ता.जि.छ. संभाजीनगर यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मौजे आंबेवाडी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथिल शेत जमीन गट नं. ५८ एकुण क्षेत्र १२ हे. ०० आर अधिक २ आर पोटखराबा क्षेत्र या जमीनीपैकी १) अलकाबाई विजय पानकडे रा. आंबेवाडी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर यांच्या मालकी व ताब्यातील संपूर्ण क्षेत्र ० हे. ८० आर जमीन तसेच २) ऋषिकेश विजय पानकडे रा. आंबेवाडी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर यांच्या मालकी व ताब्यातील संपूर्ण क्षेत्र ० हे. ३८.२५ आर अशी एकूण १ हे. १८.२५ आर जमीन ही कायमस्वरूपी खरेदी करण्याचा करार केला असून सदर जमीनीच्या एकत्रीत चर्तु:सिमा पुढील प्रमाणे आहे. पुर्वेस - सरकारी पाट रस्ता, पश्चिमेस, नावंदर यांच्याकडे जाण्याचा रस्ता, दक्षिणेस- नंदलाल नावंदर यांची जमीन आणि उत्तरेस - सरकारी पाट

असे की, अलकाबाई विजय पानकडे व ऋषिकेश विजय पानकडे यांनी सदरील जमीनी दोषमुक्त व निर्विवाद असल्याची खात्री माझ्या पक्षकाराला दिली आहे. तरी देखील या जाहीर प्रगटाद्वारे तमान जनतेस कळविण्यात येते की, सदर वरील जमीनींशी कोणाचा काही एक हक्क संबंध, चोळी बांगळी गहाण, दान, बक्षिस, खरेदी-विकी अथवा इतर कुठल्याही मागनि हक्क संबंध असल्यास त्यांनी प्रस्तूतचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कागदपत्रांच्या पुराव्यासह आमच्या नमूद पत्त्यावर आक्षेप नोंदवावा, मूटती आक्षेप न आल्यास माझे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेला आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. करीता हे जाहीर प्रगटण आज दि.२८/०२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आले.

जाहिर प्रगटन देणार तर्फे
ॲड. दत्ता एकनाथराव पानकडे
मो.नं. ९५९५६६६६२२

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

कि.दि.अर्ज क्र.१२६/२०२५

अर्जदार : १) चंद्रकलाबाई बबन शिंदे, वय ७२ वर्षे, धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) रमेश बबन शिंदे, वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) मंदा अबासाहेब आरसुळे वय ४५ वर्षे धंदा घरकाम ता. गोमळवाडी ता. नेवासा जि. अहिल्यानगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एम.व्ही. कसाने यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ व ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिण असुन अर्जदार क्र. १ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे बबन परभत शिंदे हे मौजे मांजरी ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक १२/१०/२०२३ रोजी मौजे मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत बबन परभत शिंदे यांना अर्जदार क्र.१ ते ३ असे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्धीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २७/०२/२०२५ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख ०१/०४/२०२५ रोजीची आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १०३/२०२५.

अर्जदार : १. संगिताबाई मधुकर काळे वय. ५५ वर्षे, धंदा. शेती, २. संदिप मधुकर काळे, वय. ३५ वर्षे, धंदा. शेती, दोघेही रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, ३. अर्चना राजेश पाटील, वय. ३० वर्षे, धंदा. घरकाम, रा. प्लॅट नं. ७०३, सातव नगर, पुणे सिटी, पुणे.

-विरुध्द-

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाही

अग्रलेख

संस्कृतीसोबत समृद्धीकडे...

समाजाचे मानसिक स्वास्थ्य सांभाळायचे असेल, तर त्याच्या संवेदनांची कदर केली पाहिजे, अशी आपल्या संस्कृतीची शिकवण आहे. पुराणकाळातील अनेक कथांमधून याचे पुरावे मिळतात. अन्यथा, कोणा सामान्य नागरिकाने व्यक्त केलेल्या केवळ शंकेवरून प्रभू रामचंद्रांनी पतिव्रता सीतेस अग्निपरीक्षा देऊन स्वतःचे पावित्र्य सिद्ध करण्यास सांगितले नसते. या कृतीमुळे समाजाच्या मनातील शंका दूर झाल्या आणि रामराज्याच्या संकल्पनेची उंची अधिक वाढली. राज्यकर्त्यांनी नेहमीच संशयातीत असले पाहिजे, असा जो संकेत दृढ झाला आहे, त्यामागेदेखील समाजाच्या संवेदनांची जाणीव हेच महत्त्वाचे कारण आहे. म्हणूनच रामराज्याच्या कल्पनेत केवळ सत्ता गाजविणे एवढेच अभिप्रेत नाही, तर धर्माचरणही तितकेच महत्त्वाचे मानले गेले आहे. धर्मसत्ता आणि राजसत्ता या एकाच नाण्याच्या दोन बाजू, एकाच रथाची दोन चाके आहेत वगैरे म्हटले जाते. रामराज्यात या दोन सत्ता हातात हात घालून समाजाच्या संवेदनांचा आदर करत वाटचाल करीत होत्या, म्हणून सामाजिक स्वास्थ्य चांगले होते. जेथे समाज समाधानी असतो, तेथे प्रगती आणि संस्कृती हातात हात घालून वाटचाल करतात आणि समाजाने समाधानी असावे, अशी जेथे राज्यकर्त्यांची भावना असते, तेथे त्यांच्या सामाजिक संवेदना जपल्या जाणे महत्त्वाचे असते. राजसत्ता आणि धर्मसत्ता यांनी हातात हात घालून एकत्र वाटचाल करावी, असे मानले जाते. म्हणूनच सम्राट चंद्रगुप्ताने गुरुस्थानी असलेल्या चाणक्यांच्या मार्गदर्शनाखाली आदर्श राजसत्ता राबवून साम्राज्याचा विस्तार केला, धर्मसत्तेच्या छत्रपती शिवाजी महाराजांनीही रामराज्याची संकल्पना नजरेसमोर ठेवूनच राजसत्ता राबविली आणि महात्मा गांधी यांनीही रामराज्याच्या संकल्पनेचा सातत्याने पुरस्कार केला. जेथे कोणतीही एक सत्ता शिरजोर होते, तेथे समाजाचे मानसिक स्वास्थ्य बिघडते. राजसत्तेने धर्मसत्तेस कमी लेखून तिची गळचेपी करू नये किंवा धर्मसत्तेने राजसत्तेसमोर शिरजोरी करू नये, तर दोघांनीही एकत्रितपणे समाजहिताचा विचार करून समन्वयाने सहकार्याची भूमिका घ्यावी, अशी आदर्श समाजव्यवस्थेतील कल्पना असते. जगातील अनेक देशांत जेथे धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्यात संघर्ष झाले, तेथे ती राज्ये लयास गेली, तेथील समाजजीवन अस्वस्थ झाले आणि अराजकसदृश स्थिती माजल्याचीही उदाहरणे आहेत. त्यामुळे धर्म ही केवळ समाजाच्या सुसंस्कृतपणाची आणि चांगल्या आचरणाची आदर्श संकल्पना असल्याने ती जोपासण्यासाठी राजसत्तेने पुढाकार घ्यावयास हवा, अशी अनेकांची भावना असते. धर्मसत्ता समाजाला सन्मार्ग शिकविते आणि सन्मार्गाचे आचरण करणारा समाज राजसत्तेवर दबाव निर्माण करू शकतो. जेव्हा राजसत्ता भ्रष्ट होते, तेव्हा धर्मसत्ता त्यास मार्गावर आणते, असे एक विधान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या पर्वात एका धार्मिक सोहळ्यादरम्यान बोलताना केले, तेव्हा त्यावरून मोठे वादळ माजले. धर्मसत्तेचे अस्तित्व ज्यांना सातत्याने त्रासदायक वाटत असते, त्यांनी यावरून मोठा गदारोळही केला. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या नावाखाली जनतेच्या श्रद्धास्थानांची खिल्ली उडविणाऱ्या काही पुरोगामी मानसिकतेच्या लोकांनी यावर रण माजविले, पण त्या काळात धर्मसत्तेच्या विधायक कामांची यादी देत स्पष्ट करून धर्मसत्तेकडून झालेल्या समाजहिताच्या कामांमुळे सामाजिक स्वास्थ्य सुधारल्याचे पुरावेच समोर मांडले गेल्याने, अस्वस्थांच्या फौजांना वैचारिक माघार घ्यावी लागली होती. कारण धर्मसत्तेशी सामाजिक संवेदनांचे जवळचे नाते असते. समाजाच्या धार्मिक भावनांची कदर केल्यास सामाजिक स्वास्थ्य संतुलित राहते व राजसत्तेला आपले समाजहिताचे विहित काम करणे सोपे जाते, याची अनेक उदाहरणे याआधीही समोर आली आहेत. अयोध्येतील वादग्रस्त वास्तूच्या जागी श्रीरामाचे मंदिर उभारण्याचा प्रश्नही धर्मसत्ता आणि राजसत्तेने हातात हात घालून सामाजिक संवेदनांची कदर करीत सोडविल्यामुळेच सहजपणे सुटला, हा इतिहास या देशातच निर्माण झाला आहे. अन्यथा अनेक शतकांपासून केवळ धार्मिक संवेदनांना धक्का लागण्याच्या भीतीने राजसत्तेने ही समस्या सोडविण्यात चालढकल केली नसती. जेव्हा धर्मसत्तांसोबत सामंजस्याने व सहमतीने या प्रश्नांची उकल करण्याची तयारी राजसत्तेने दाखविली, तेव्हा या प्रश्नाभोवती माजलेली समज-गैरसमजाची जळमटे दूर करून समस्या सोडविणे सोपे झाले. धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्या समन्वयाचे हे अलिकडच्या काळातील सर्वात श्रेष्ठ उदाहरण मानावयास हवे. यामुळे समाजाच्या धार्मिक संवेदनांची कदर करण्याचा, समाजाच्या धार्मिक भावना जपण्याचे आणि जोपासण्याचे महत्त्व राजसत्तेस उमगले आणि समाजालाही ते पटले. म्हणूनच नवतेची कास धरताना, प्रगतीच्या दिशेने वाटचाल करताना, परंपरांना पुरते झुगारून न देता परंपरांच्या शिकवणुकीचा धांडोळा घेत नव्या वाटचालीची दिशा निश्चित करण्याचे गेल्या दशकभरातील राजसत्तेचे धोरण देशाच्या हिताचे ठरताना दिसत आहे. या काळात धार्मिक तेढ माजून समाजस्वास्थ्य बिघडण्याच्या घटना अत्यंत अभावाने नोंदविल्या गेल्या, उलट, परस्परांच्या धार्मिक भावना जपण्याच्या जाणिवा प्रगल्भ होत गेल्याने जुन्यापुराण्या अनेक समस्यांवरील उत्तरेदेखील दृष्टिपथात येऊ लागली, जुन्या चुकांच्या जाणिवा जाग्या झाल्या आणि त्या सुधारण्याची संधी शोधण्याची मानसिकताही रुजू लागली. धर्मसत्तेने राजसत्तेसोबत समन्वयाने केलेल्या वाटचालीचा हा परिणाम अलिकडच्या दशकात नजरेआड करून चालणार नाही. अलिकडच्या काही वर्षांत समाजावरील धर्मसत्तेचा पगडा वाढू लागला असून धर्मसत्तेच्या अस्तित्वाचे जे काही चांगले परिणाम असतात, त्याची उदाहरणेही दिसू लागल्याने राजसत्तेने धर्मसत्तेच्या सन्मानाची भूमिका घेत आखलेल्या धोरणांचे स्वागत होणे साहजिकही आहे.

म्हणूनच १४४ वर्षांनी प्रयागराजच्या पवित्र संगमस्थळी पार पडलेल्या महाकुंभ मेळ्याचे नेटके आयोजन करून कोट्यवधी भाविकांच्या धार्मिक भावनांचा सन्मान करीत त्यांना समाधानाचा अनुभव देण्याचे समंजस नियोजन राजसत्तेकडून केले गेले. प्रयागराज येथील हा विक्रमी सोहळा अनुभवलेल्या भारतास आता धर्मसत्तेविषयीच्या सामाजिक जाणिवांची नेमकी जाणीव झाली असेल, यात शंका नाही. धर्म ही एक जीवनशैली आहे आणि भारतातील बहुसंख्य समाज हीच जीवनशैली शेकडो-हजारो वर्षांपासून आचरणात आणत असल्याने त्याचा आदर करणे हे समंजस राज्यकर्त्यांचे कर्तव्य ठरते. याच जाणिवेतून केंद्रातील मोदी सरकारने आणि उत्तरप्रदेशातील योगी सरकारने प्रयागराजच्या महाकुंभ मेळ्याच्या निमित्ताने समाजाच्या संवेदनांना समाधान देणारे नेटके आयोजन करून धर्मसत्तेसोबत वाटचाल करण्याच्या आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार करून दाखविला आहे. असे केल्याने केवळ समाजाच्या मानसिक भावनांचा सन्मान होतो एवढेच नाही, तर परंपराची जपणूक करताना आधुनिकतेच्या वाटचालीला बळ देणारे आर्थिक पाठबळही प्राप्त होते, हेही या निमित्ताने दिसून आले. महाकुंभ मेळ्याच्या मुहूर्ताचे पुण्य पदरी बांधण्यासाठी प्रयागराजला दाखल झालेल्या सुमारे ६५ कोटी भाविकांच्या सहभागामुळे उत्तरप्रदेशासारख्या राज्याच्या प्रगतीच्या वाटचालीस मिळालेले आर्थिक पाठबळाचे पंख आता सामाजिक विकासाच्या प्रकल्पांची नवी उंची गाठण्यासाठी साह्यभूत ठरणार आहेत. ४५ दिवस चाललेल्या या जगातील सर्वात मोठ्या धार्मिक सोहळ्याची सांगता होत असताना समोर आलेली माहिती याची पुष्टी देणारी आहे. महाकुंभच्या सोहळ्यात नेमका आकडा सांगायचा झाला, तर देश-विदेशातील ६६.३१ कोटी भाविकांनी प्रयागराज तीर्थाचे दर्शन घेत या सोहळ्यात सहभाग नोंदविला. अखेरच्या केवळ एकाच दिवसात या तीर्थस्थानी सुमारे अडीच कोटी भाविकांनी हजेरी लावली. प्रयागराजच्या भाविकांचा हा सोहळा पाहता चीन, भारतासारख्या देशांचा अपवाद करता, जगातील कोणत्याही देशाच्या लोकसंख्येहून अधिक भाविकांचा महासागर संगमस्थानी दाखल झाला, हे स्पष्ट होते. ७३ देशांच्या राजनैतिक अधिकाऱ्यांनी या सोहळ्याचा अनुभव घेतला, नेपाळमधून सुमारे ५० लाख भाविकांनी प्रयागराजच्या पवित्र संगमस्नानाचे पुण्य पदरी बांधून घेतले, तर पाश्चिमात्य देशांतूनही असंख्य भाविकांनी हा सोहळा याचि डोळा अनुभवण्यासाठी प्रयागराज गाठले. जगाच्या कानाकोपऱ्यातून सुमारे ४५ कोटी भाविक दाखल होतील, उत्तरप्रदेशच्या अर्थव्यवस्थेस मोठी चालना मिळेल व राज्याच्या सकल उत्पन्नात साडेतीन लाख कोटींची भर पडेल, असा उत्तरप्रदेश सरकारचा अंदाज होता. प्रत्यक्षात ६६ कोटी भाविक या सोहळ्यात सहभागी झाल्याने उत्तरप्रदेशच्या सकल राज्य उत्पन्नात चार लाख कोटींची भर पडणार असल्याचे सांगितले जात आहे. या महासोहळ्याच्या निमित्ताने सुमारे २८०० विमानांतून साडेचार लाख भाविकांनी प्रवास केला, भाड्याने घेतलेल्या ७०० विमानांमुळे या क्षेत्रातील व्यवसायात एक नवा विक्रम प्रस्थापित झाला, १८ हजार ८३० रेल्वेगाड्यांतून देशाच्या कानाकोपऱ्यांतून १५ कोटी भाविक प्रयागराजला दाखल झाले. धार्मिक सोहळ्यातून आर्थिक उन्नतीचा आगळा मार्ग दाखविणाऱ्या या महाकुंभ मेळाव्याच्या नियोजनातून धर्मसत्तेने राजसत्तेला दिलेले आर्थिक बळ ही देशाच्या प्रगतीची मोठी शक्ती ठरणार आहे.

एकतेचा महायज्ञ ठरलेल्या या महाकुंभ मेळ्याची आता सांगता झाली आहे. गेल्या ४५ दिवसांत भारतालाच नव्हे, तर संपूर्ण जगाला भारतीयांच्या धार्मिक आस्थांचे, सामंजस्याचे आणि परस्पर सहकार्याचे अनोखे दर्शन या सोहळ्यातून घडले आहे. संस्कृती आणि वारसा यांचे बोट धरूनच देशाला भविष्याची वाटचाल करावयाची आहे, असा संदेशच जणू या सोहळ्यातून भारतीय जनतेने राजसत्तेला दिला आहे. हा संकेत ओळखून धर्मसत्तेच्या हातात हात घालून राजसत्तेची वाटचाल सुरू राहील यासाठी सरकारने आपल्या कृतीतून दिलेली ग्वाही हेच समाजाचे संचित ठरणार आहे.

दखल

मोरेश्वर बडगे

भाषा मरताहेत, जागे व्हा

राजकारणाचा चिखल झाला आहे. राजकारण चिवडणे म्हणजे तो चिखल अंगावर उडवून घेण्यासारखे झाले आहे. तरीही माणसाला राजकारण सोडवत नाही. नुकतेच दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. त्यात साहित्य कमी आणि राजकारणच अधिक झालेले दिसले. साहित्य आणि एकूण मराठी साहित्य आणि मराठी भाषा यांच्याबद्दलच्या एकूणच उदासीनतेने या संपूर्ण प्रकाराला अलिकडे उत्सवी स्वरूप आले आहे. कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांचा जन्मदिन आला की आपण 'मराठी भाषा दिन' म्हणून साजरा करतो. 'डोक्यावर सोनेरी मुकुट आणि फाटक्या वस्त्रानिशी माय मराठी मंत्रालयाच्या दारात उभी आहे' असे कुसुमाग्रजांनी म्हटले होते. ते गेले. मात्र माय मराठी आजही फाटकावरच आहे. तसे पाहिले तर मराठी ही काय लहानसहान भाषा नाही. १५० कोटी लोकसंख्येच्या भारतात मराठी भाषा बोलणारे सुमारे ८-१० कोटी लोक असावेत. भारताबाहेर जगभरात मराठी बोलणारे दोन कोटी लोक सहज असतील. त्यानुसार मराठी देशातील चौथ्या क्रमांकाची आणि जगातील दहाव्या क्रमांकाची भाषा आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात मराठी बोलली जात असली, तरी जागतिक बाजारात तिला फारसे स्थान नाही. म्हणून प्रतिष्ठा नाही. मराठी ही मृत्युपंथाला लागलेली भाषा आहे, असे फार पूर्वी इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी सांगून ठेवले होते. १९६० साली महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर मराठीची तब्येत सुधारता आली असती. मात्र मराठीत कागदोपत्री राजभाषेचा दर्जा देण्यापलीकडे काही झाले नाही. मराठीच्या नावाने विद्यापीठांमध्ये मराठी विभाग आहेत, मराठीच्या नावाने संस्था आहेत, सरकारचा विभाग आहे तरीही मराठी खंगत चालली आहे. मग कशी वाचवायची मराठी?

नव्या परिस्थितीत मराठीला काही मर्यादा पडतात. जगभरातले नवे संशोधन, ज्ञान सर्वात आधी इंग्रजीतून येते. त्या अर्थाने इंग्रजी ही जागतिक पातळीवरचा ज्ञानभाषा आहे आणि बाजारपेठेचीही भाषा आहे. पण मराठीचे काय हाल केले आपण? तिला महाराष्ट्रापुरते करून ठेवले. महाराष्ट्रातही मराठी घरात बोलली जात असेल. मात्र बाहेर हिंदी-इंग्रजीत बोलताना मराठी माणसे दिसतात. साधी भाजी खरेदी करताना हिंदीत बोलणारी मराठी माणसे तुम्हाला गल्लोगल्ली दिसतील. 'महाराष्ट्रात राहायचे असेल तर मराठीत बोलले पाहिजे' हे सांगण्यासाठी आजही भांडावे लागते. मराठी शाळा बंद पडताहेत. नोकरी पाहिजे असेल तर इंग्रजी माध्यमातून शिकावे लागते हे कटू वास्तव आहे. डॉक्टर, इंजिनीअर व्हायचे असेल तर इंग्रजीशिवाय गत्यंतर नाही. अलिकडे तर इंटरनेट आणि संगणकाने धुमाकूळ घातला आहे. लहानांचेच नाही तर मोठ्यांचेही वाचन बंद झाले आहे. पुस्तक प्रदर्शनाला गर्दी होते ती केवळ दिखाव्यापुरती. आपण वाचतो, पण मोबाईलवर वाचतो. किंडलवर कादंबरी वाचल्याचे अनेक जण अभिमानाने सांगतात. लायब्ररीत जाऊन आवडीचे पुस्तक घरी आणून वाचणारे दुर्मिळ झाले आहेत. पूर्वी नव्या पुस्तक-कादंबरींवर चर्चा व्हायच्या. आज या सारी गोष्टी इतिहासजमा झाल्यासारख्या आहेत. 'ए.आय.' म्हणजे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स या नव्या प्रकाराची सध्या प्रचंड मागणी आहे. हे शिकायचे म्हणून नवी पिढी झपाट्याने इंग्रजीकडे वळते आहे. दगडी पाटीची जागा संगणकाने घेतली हे कळले तेव्हा उशीर झाला होता. नोकऱ्यांपासून व्यवसायापर्यंत कोणत्याही पातळीवर मराठी भाषेशिवाय पर्याय नसेल, अशी परिस्थिती महाराष्ट्रात आपल्याला निर्माण करता आली नाही. इंग्रजीत शिकवले जाणारे अभ्यासक्रम मराठीमध्ये अनुवाद करून शिकवले जाऊ शकतात. हे आव्हान पेलू शकतील एवढ्या ताकदीचे मराठी भाषाप्रभू आपल्याकडे अजूनही आहेत. पण सरकारी अनास्था मराठीला बुडवते आहे. मराठी भाषेला आपण अभिजात भाषेचा दर्जा मिळविला खरा; पण म्हणजे काय मिळविले? एक दिवस मराठीचा उत्सव करायचा म्हणजे ३६४ दिवस मराठीकडे दुर्लक्ष करायला मोकळे अशी ही विचित्र मानसिकता आहे.

प्रश्न केवळ मराठीचा नाही. 'युनिस्को'ने तर जगभरातील भाषा मरत असल्याबद्दल १९९१ पासूनच चिंता व्यक्त करायला सुरुवात केली आहे. त्या आधी भाषा कुठे होती? सुमारे ७० हजार वर्षांपूर्वी माणसाने शब्दांच्या माध्यमातून जगाला पकडण्याचा प्रयत्न सुरू केला. म्हणजेच माणसाच्या पाच लाख वर्षांच्या उत्क्रांतीच्या इतिहासात भाषेचा इतिहास सुमारे ७० हजार वर्षांचा आहे. मात्र आता काय झालंय, की आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे माणूस त्याची भाषा सोडून संवाद साधण्याच्या वेगळ्या दुनियेत जाऊ लागला आहे. भाषा नसती तर सूर्य-चंद्र अशा अगणीत गोष्टींना आपण ओळखू शकलो नसतो. पूर्व-पश्चिम या दिशा आहेत की नाहीत, आपल्याला माहीत नाही. परंतु कोणाच्या तरी सांगण्यावरून आपण तसे मानतो. भाषा असल्यानेच आपण प्रत्येक गोष्टीविषयी काही सांगू शकतो. मात्र, विकासाच्या नावाखाली आदिवासी, भटके-विमुक्त जातींना वेगळ्याच गर्दीत ढकलले तर त्या त्यांचीच भाषा विसरून नवी भाषा स्वीकारतील. जंगलातल्यांच्या भाषा ऐकू येईनाशा झाल्या आहेत. त्याचे कारण हे आहे. 'युनेस्को'च्या मते, जगातील सुमारे सात हजार भाषांपैकी चार हजार भाषा या पुढील ३० वर्षांत मरून जातील. उरलेल्यांपैकी १७०० भाषा या नेहमीच्या वापरात नसल्याने बाजूला पडतील. जगभरात जेमतेम ३०० भाषाच तग धरतील. कारण आठवड्याला एक किंवा त्याहून अधिक गतीने भाषा मरत आहेत. भाषा मरताहेत म्हणजे नेमके काय होत आहे? सोपे उदाहरण देतो. चिप, मेमरी बँक या साऱ्याचा प्रभाव इतका वाढत चालला आहे की, एखादी गोष्ट लक्षात ठेवायची माणसाची क्षमता घटत चालली आहे. परिणामी भविष्यात माणसाची बुद्धी ही अर्धी जैविक आणि अर्धी यांत्रिक होण्याची भीती दिसत आहे. महाराष्ट्रात मराठीच्या १७-१८ बोली आहेत आणि ५२ इतर भाषा आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे मुलांचा ओढा वाढल्याचे परिणाम आपण पाहतो. मराठी कुटुंबातल्या शाळकरी मुलांना धड मराठी बोलता येत नाही. सध्याच्या डिजिटल जमान्यात लोकांचे लिहिणे-बोलणे कमी झाले आहे, संवाद कमी झाला आहे. पूर्वी ओळखीचे फोन नंबर आपल्याला तोंडपाठ असायचे. मात्र, या डिजिटल युगात काहीही लक्षात ठेवण्याचे कष्ट आपण घेत नाही. आपण पूर्णपणे तंत्रज्ञानाच्या आहारी जात आहोत. आपण थेट 'सेव्ह' करतो. काहीच लक्षात ठेवायचे नाही, अशी ही वृत्ती धोकादायक आहे. भाषा सोडून माणूस संवादाच्या वेगळ्याच जगात निघाला आहे. पूर्वी प्रत्येक जिल्ह्यामागे भाषा बदलायची. काही प्रमाणात आजही तुम्हाला ते समोरच्याच्या बोलण्यात जाणवते. बोलण्यावरूनच तुम्ही तो कुठल्या भागाचा आहे ते ओळखू शकाल. 'मले-तुले' हे शब्द खेड्यात बोलण्यात यायचे. आता खेड्यातही हे शब्द कमी ऐकायला येतात. म्हणजे ती गावरानी भाषा मरणपंथाला लागली आहे. शहरात दिसणारी सारी माणसे एकाच पट्टीत बोलताना जाणवतात. आधुनिक तंत्रज्ञान, जागतिकीकरण हे भाषासंहाराला कारण ठरत आहे. हवामान बदलही भाषांचा बळी घेताना दिसत आहे. हवामान बदलाने जगभरातील द्वीपसमूह आणि किनारे जसजसे बुडू लागतील तेव्हा त्यांच्यासोबत अनेक भाषाही चिरविश्रांती घेणार आहेत. कारण जिवाच्या भीतीने लोक इतरत्र राहायला जातील. ते जिथे कुठे जातील तिथली भाषा त्यांना शिकावी, बोलावी लागेल. म्हणजे त्यांच्या जुन्या भाषेचा मृत्यू. केवळ स्थलांतरण या कारणाने सध्या दर ४० दिवसांनी पृथ्वीच्या पाठीवरील एक भाषा मरत आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. भाषांच्या अस्तित्वाचे संकट हे असे बहुअंगी आहे. एक भाषा मरते म्हणजे काय होते? एका अर्थाने तिथल्या छोट्या संस्कृतीला आपण मूठमाती देत असतो. तेव्हा हे संकट ओळखा. आपापल्या भागातली भाषा वाचवली तरी तो खारीचा वाटा असेल.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

वेध

संजय रामगिरवार

'जिस धर्म के नाम से रोटी मिल जाये!'

हाथ मे रोटी लिए उसने हँस के पूछा,
"किस धर्म से ताल्लुक रखते हो?"
उस भिखारी ने भी रोते कहां,
"जिस धर्म के नाम से वो रोटी मिल जाये!"

हे खरे आहे, दानाला सर्वच धर्मांत महत्त्वाचे स्थान आहे. 'दानधर्म' या संज्ञेतून दान करणे म्हणजे धर्माचार मानला जातो आणि त्यावरच भिकाऱ्यांचे जीवन टिकले आहे. ज्यांच्याकडे जगण्यासाठी दुसरा काहीच पर्याय नसतो अशांना बाजूला ठेवले तरी जेव्हा धडधाकट व्यक्ती भीक मागताना दिसते, तेव्हा याच धर्माचाराचा दुरुपयोग होत असल्याची जाणीव अस्वस्थ करते. अशा भिकाऱ्यांचे राष्ट्रनिर्मितीत योगदान काय, हा प्रश्न आता आपसूक उपस्थित होतो.

परवा प्रयागराज येथील महाकुंभात असेच काही भिकारी भेटले. त्यांनी काही लहान मुलेही भीक मागायला सोडली होती. मुलांचे केविलवाणे चेहरे पाहून त्यांना पैसे दिले पाहिजे असे वाटत असतानाच, तुम्ही त्यांना वाईट सवय लावता आहात, असे एक मित्र म्हणाला. काही वर्षांपूर्वी एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने नोंदविलेला अभिप्राय वाचला. तो अत्यंत महत्त्वाचा होता. 'निराधार व्यक्ती आणि भिकाऱ्यांनीदेखील देशासाठी काम करायला हवे' असे सुचवत तत्कालीन मुख्य न्यायाधीश दीपांकर दत्ता आणि न्या. गिरीश कुळकर्णी यांच्या खंडपीठाने याप्रकरणी दाखल याचिका निकाली काढली होती. बेघर आणि गरीब व्यक्ती तसेच भिकाऱ्यांना दिवसातून तीन वेळा पोषक अन्न, पिण्याचे स्वच्छ पाणी, निवारा व अन्य सुविधा उपलब्ध करण्यास मुंबई मनपाला बाध्य करावे, अशी विनंती याचिकाकर्त्याने तेव्हा केली होती. न्यायालयाने मात्र मनपाची भूमिका मान्य करीत, साऱ्याच गरजा सरकार पूर्ण करू शकत नाही, असा अभिप्राय नोंदविला. देश आत्मनिर्भतेकडे कलला असताना न्यायालयाचा हा निकाल या विषयावर गंभीरतेने चिंतन करण्यास भाग पाडणारा होता.

देश वेगाने आर्थिक प्रगतीकडे वाटचाल करीत असताना, भिक्षापात्रांची संख्याही तेवढ्याच वेगाने वाढत जाणे ही मोठी समस्या मानली पाहिजे. मानवाधिकार आयोगानुसार, दरवर्षी सुमारे ४० हजार मुलांचे अपहरण करून त्यांना भीक मागायला लावले जाते. त्यांचे पूर्ण आयुष्यच यात संपते. वाहतुकीच्या छेदनबिंदूवर लाल दिवे लागताच अशा कितीतरी मुलांसह महिला-पुरुष, ज्यात बहुतांश धडधाकटच असतात; मात्र भीक मागताना दिसतात. मंदिर, मशीद व अन्य धार्मिक ठिकाणांसह रेल्वेगाड्यांतूनही हेच चित्र दिसते. काही तर भिकेसाठी जबरदस्ती करताना दिसतात. त्यावेळी त्यांची कीव येण्याऐवजी राग जास्त येतो. सरकारी आकड्यानुसार, पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेशात सर्वाधिक तर आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान व महाराष्ट्रातही मोठ्या संख्येत भिकारी आहेत आणि हा चिंतेचा विषय ठरावा.

बरे, सारेच भिकारी गरीब असतातच असे नाही. मुंबई-परळ भागातील भीक मागणारे भारत नामक गृहस्थ यांच्याकडे १ कोटी ४० लाखांच्या दोन सदनिका आहेत. दरमहा ७५ हजार रुपयांची भीक मागणारा हा इसम देशातील सर्वात श्रीमंत भिकारी मानला जातो. वयाच्या सोळाव्या वर्षीपासून लक्ष्मी नावाच्या महिलेने भीक मागायला सुरुवात केली आणि ५० पेक्षा अधिक वर्षांच्या आयुष्यात लाखो रुपये बँकेत जमा केले. दरमहा त्या ३०-४० हजार मिळवतात. मुंबईतीलच चर्नी मार्गावर भीक मागणाऱ्या गीताने एक सदनिका खरेदी केली आहे. त्या ४५ हजार रुपये महिन्याकाठी प्राप्त करतात. भीक मागून जगणाऱ्या गोवंडीतील चंद्र आझाद यांच्याकडे स्वतःचे घर, ८.७१ लाख रुपये बँक खात्यात तर १.५ लाख रुपयांची रोख जमा होती. २०१९ मध्ये रेल्वे अपघातात त्यांचा मृत्यू झाला. नंतर पोलिसांनी ही संपत्ती शोधून काढली. बिहारच्या पाटण्यातील रेल्वे प्लॅटफार्मवर भीक माणारा पप्पूसुद्धा श्रीमंत भिकाऱ्यांच्या यादीत आहे. त्याच्याकडे १.२५ कोटींची संपत्ती आहे.

भीक मागणे हा गुन्हा आहे की नाही, यावर वाद असू शकतो. मात्र, भारतीय रेल्वे कायदा (१९४१) नुसार रेल्वेगाड्यांतून भीक मागण्यावर प्रतिबंध आहे. तरीही गाड्यांत चढून पैसे मिळेपर्यंत मग्रुरीने उभे ठाकणारे भिकारी सर्वांच्याच अनुभवाचे असतील. ज्याला उदरनिर्वाहाचे प्रकट साधन नसेल किंवा जो आपणाविषयी व्यवस्थित माहिती देऊ शकत नसेल तोच भिकारी, अशी व्याख्या फौजदारी-व्यवहार-संहिता कलम १०९ मध्ये केली गेली आहे. धडधाकट तरुण यात मोडत नसतानाही सार्वजनिक ठिकाणी उपद्रव करून भीक मागताना तो दिसतो. अशांवर मात्र कलम १३३ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करता येते. विषय सामाजिक बदलाचा आहे. त्यावर समाजातच गंभीरतेने चिंतन झाले पाहिजे.

९८८१७१७८३२

दृष्टिकोन

विजय पांढरीपांडे

भांडण : माणसाचा स्थायीभाव

भांडण माणसाचा स्थायीभाव आहे. भांडण अनुभवले नाही अशी व्यक्ती सापडणे कठीण. आपला स्वभाव, आपले वागणे कितीही चांगले, संयमित असले तरी आपल्या भोवतीची माणसे, म्हणजे जवळची, दूरची नाती, मित्र तसे नसतात. उदाहरणार्थ आपण वाहन कितीही चांगले, सावधगिरीने चालवले, सगळे नियम पाळले तरी अपघात दुसऱ्याच्या चुकीने होतो. कधी कधी आपलीही चूक असते. कुणीही शंभर टक्के परफेक्ट नसतो. भांडणे घरात होतात. नवरा-बायको, भाऊ-बहीण, बाप-लेक, सासू-सून अशा कुठल्याही नात्यात केव्हाही, कुठल्याही कारणाने वितुष्ट येते. कधी कधी तर ही भांडणाची कारणे क्षुल्लक असतात. हास्यास्पद असतात, पण लहान-सहान कारणाने भांड्याला भांडे वाजते. पूर्वी इस्टेट, जमीनजुमला, हिस्सेवाटे यावरून भांडणे कॉमन होती. हे जमिनीचे वाद तर फक्त घरा-कुटुंबापुरते मर्यादित नसतात. दोन राज्यात, दोन देशात होणारी भांडणे वर्षानुवर्षे चालू आहेत. ती भयानक रक्तरंजितदेखील असतात. हे सारे स्वामित्वाच्या हक्काची जाणीव प्रबळ झाल्यापासून हजारो वर्षांपासून चालू आहे. रामायण-महाभारत म्हणजे भांडणाच्या कहाण्या. त्यात कुठे तीव्रता कमी-जास्त असेल; पण हे पुराण काळापासून चालू आहे, हे मात्र खरे. आपला मर्यादित संयम हे भांडणाचे मूळ असते. प्रत्येकाला आपले तेच खरे वाटण्याचा आग्रह हे भांडणाचे मूळ असते. आपण नेहमी दुसऱ्याला, प्रतिपक्षाला खोटे ठरविण्याचा प्रयत्न करतो. अहंभावाने प्रत्येकालाच घेरले असते. कुणी कोणतीही गीता सांगितली, तत्त्वज्ञान पाजळले तरी ते आपल्या पचनी पडत नाही, ही वस्तुस्थिती आहे. माघार कुणी घ्यायची, यातच तू तू मी मी चालते! पाऊल मागे घेणे म्हणजे हार स्वीकारणे हा भयगंड असतो. या भयगंडाने आपण सगळेच ग्रासलो असतो.

कौटुंबिक भांडणाचा विचार करायचा झाला तर ज्या दोन पायावर संसार उभा असतो त्या नवरा-बायकोचे न पटणे ही सुरुवात असते. अरेंज मॅरेजचे सोडा, अगदी एकमेकांना आधी जीव लावणारी, लग्नाच्या बंधनात अडकली की मंगळसूत्राचेच जोखड वाटायला लागते! जी मुलगी लग्नानंतर स्वतंत्रपणे आपल्या भल्याचा, भविष्याचा विचार करण्याऐवजी आई-वडिलांची शिकवणी घेते, ती घटस्फोटाच्या पदवीची तयारी करीत असते! या तरुण, वयस्कर आपल्या पोटच्या तरुण अपत्याचीदेखील चिंता नसते. पूर्वी निदान मुलासाठी, कुटुंबाच्या प्रतिष्ठेसाठी समाज भयाने का होईना लग्न टिकवून ठेवणे, नाती निभावून नेणे याची धडपड होती. आता सुशिक्षित जोडीत तीही समंजस वृत्ती राहिली नाही. शिक्षणाने शहाणपण वाढण्याऐवजी वेडेपणा वाढला आहे. सगळ्याच क्षेत्रात, सगळ्याच बाबतीत! हे वेडेपण कुटुंबातील इतर नाते संबंधातील भांडणाला, वितुष्टाला तितकेच कारणीभूत आहे.

अगदी जवळचे म्हणणारे मित्र-मैत्रिणीदेखील साध्या कारणाने भांडतात. कधी स्पर्धा, कधी असूया, कधी साधे गैरसमज, कधी तोंडातून अनवधानाने निघून गेलेला अपशब्द असे कसलेही क्षुल्लक कारण भांडणाला, वर्षानुवर्षे जोपासलेला स्नेह संपायला पुरेसे ठरते. आधी एकमेकावर जीव ओवाळायचा न मग एक दुसऱ्याच्या छाताडावर बसायचे, एकमेकाचे लचके तोडायचे हे वर्तन समजुतीच्या पलीकडचे असते. आता तर अनेक छोट्या-मोठ्या राज्यात, देशात हिंसक भांडणे चालू आहेत. संहारक युद्ध पेटले आहे. वाद जमिनीचे, बॉर्डरचे वाटत असले, तरी जात, वर्ग, वंश, वर्ण भेद हे आपल्या संस्कृतीत खोलवर रुजले आहेत. धार्मिक मतभेद तर शतकानुशतके सुरू आहेत. तडजोड करायला, मध्यस्थी स्वीकारायला कुणाचीच तयारी नाही. मेरे मुर्गी की एकही टांग अशी जिद्दी वृत्ती आहे. या सीमारेषावर भयानक नरसंहार सुरू आहेत. स्त्रियांवर अत्याचार होताहेत. निष्पाप मुले अनाथ होताहेत. हे सगळे बघता दोन पायाचा माणूस बघता बघता चार पायांचा जनावर कसा झाला, हा प्रश्न पडतो. जगाला शांती-अहिंसेचा संदेश देणारे गांधीजी खरेच होऊन गेलेत का आधी, अशी शंका वाटावी; इतकी भयानक परिस्थिती आहे.

ज्या लोक प्रतिनिधींना लोकशाही पद्धतीने आपण निवडून देतो, ज्यांच्या कडून सुशासनाची, रामराज्याची अपेक्षा करतो तीही मंडळी सरकारचा कारभार करायचे सोडून एकमेकांशी भांडण्यात. एकमेकांची उणीदुणी काढण्यात, एकमेकांचे पाय ओढण्यात धन्यता मानतात. कुठेही वैचारिक निष्ठा, राष्ट्राची चिंता दिसत नाही. आहे ती सत्ता लालसा अन् स्व

ज्याची क्षमता त्याला संधी : अजित पवार

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २८ फेब्रुवारी

राष्ट्रवादी काँग्रेसपासून दूर गेलेले कार्यकर्ते, पदाधिकारी पुन्हा जोडले जात आहेत. पक्षात कुठलाही दुजाभाव नाही, हा नविन हा जुना असा कुठलाही भेदभाव नसून ज्याच्यात क्षमता आहे त्यांना नक्कीच संधी मिळेल, असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. शहरातील ओम गार्डन येथे आयोजित पक्षप्रवेश सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी माजीमंत्री नवाब मलिक, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार सतीश चव्हाण, आमदार विक्रम काळे, माजी आमदार यशवंत माने, माजी आमदार सुरेश जेथलीया, माजी आमदार मोहन हंबर्डे, माजी आमदार अविनाश घाटे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे, दिव्यांग सेलचे कार्याध्यक्ष रामदास पाटील सोमठाणकर, जिल्हाध्यक्ष दिलीप धर्माधिकारी, माजी जि.प.अध्यक्ष वैशाली चव्हाण, गफार खान यांची यावेळी उपस्थिती होती.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मागील ३४ वर्षाच्या कार्यकाळात नांदेडला अनेकवेळा भेट दिली. परंतु अशा प्रकारचा उत्साह यापूर्वी कधी दिसून आला नाही. दूर गेलेले कार्यकर्ते पुन्हा जोडले जात आहेत. त्यामुळे सर्वांनी मिळून पक्ष वाढविण्याचा प्रयत्न करायचा आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकामध्ये वंचित कार्यकर्त्यांना संधी मिळाली पाहिजे. महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका आदी निवडणूकांमध्ये राष्ट्रवादीचे वर्चस्व कसे निर्माण होईल यासाठी प्रयत्न करायला हवे, त्यासाठी सर्व घटकांना न्याय मिळवून देण्याची गरज आहे. लाडक्या बहिणीच्या अपेक्षा, गरीबांच्या हिताच्या योजना या माध्यमातून न्याय देण्याचे सरकारचे काम आहे. त्याचबरोबर सरकार कुठलेही असले तरी पोलिसांनी देखील राजकीय दबावापोटी भूमिका न घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मराठवाड्यात पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. बाभळी बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांना पाणी मिळाले असले तरी नाशिकच्या पश्चिम भागातील पाणी मराठवाड्यात आणण्याची योजना सुरु करण्यात आली असून, पाण्याचा प्रश्न देखील मिटणार आहे. येत्या ३ मार्चपासून विधीमंडळाचे अधिवेशन सुरु असून, दि.१० मार्च रोजी अर्थसंकल्प सादर करण्यात येणार आहे. केंद्रातील अर्थसंकल्पाप्रमाणेच हा संकल्प देखील सर्वसमावेशक तसेच सर्वसामान्यांच्या हिताचा राहणार असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले.

माजी आमदार हंबर्डे, वैशाली चव्हाण, गफार खान यांचा प्रवेश

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत ओम गार्डन येथील सोहळ्यात माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा वैशाली चव्हाण, माजी नगरसेवक गफार खान यांच्यासह असंख्य काँग्रेस व अन्य पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

प्रवेश जाहीर होताच रोखण्याचा प्रयत्न

नांदेड शहरातील एका माजी नगरसेवकाने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यासबंधाने बॅनर लावले होते. हि बाब उघड होताच आमच्या एका मित्राने त्याच्या घरी जावून त्याला राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशापासून रोखले असल्याचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी जाहीर केले. परंतु असे कितीही प्रयत्न झाले तरी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येणाऱ्यांची संख्या कमी होणार नसून आगामी काळात नांदेड हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला होणार असल्याचा विश्वास आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला.

नविन नांदेड - उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत माजी आमदार मोहन हंबर्डे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केल्यानंतर मी तुमच्या पाठीशी आहे, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोहनराव हंबर्डे यांना दिला. यावेळी आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

संक्षिप्त वृत्त

शिवसेनेच्या हर्षदाताई सिरसाठ यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

किनवट-शिवसेना शिंदे गटाच्या संघर्ष कन्या हर्षदाताई संजय शिरसाट यांचा वाढदिवस किनवट शहरात उत्साहात साजरा करण्यात येणार असून या निमित्त संथागार वृद्धाश्रमात अन्नदान तर ग्रामीण रुग्णालयात फळे वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमास शिवसेना-शिंदे गटाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन तालुकाप्रमुख अजय कदम पाटील व विधानसभा प्रमुख दयाभाऊ पाटील यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री नामदार संजय शिरसाठ यांची सुकन्या तथा शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या हर्षदा संजय शिरसाट यांचा दि. २ मार्च २०२५ रोजी वाढदिवस असून किनवट तालुका शिवसेना शिंदे गटाच्या वतीने संघर्षकन्या हर्षदाताई शिरसाट यांचा वाढदिवस २ मार्च रोजी किनवट शहरात विविध उपक्रमांनी साजरा केला जाणार आहे. यानिमित्त संथागार वृद्धाश्रमात अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित केला आहे तर गोकुंदा येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळे वाटप करण्यात येणार आहेत या कार्यक्रमासाठी शिवसेना शिंदे गटाचे सर्व पदाधिकारी सर्व आघाड्याचे प्रमुख तसेच कार्यकर्त्यांनी २ मार्च रोजी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विधानसभा प्रमुख दयाभाऊ पाटील व तालुकाप्रमुख अजय पाटील कदम यांनी केले आहे.

तालूकास्तरीय पाककृती स्पर्धेत श्री. संत कैकाडी महाराज शाळा द्वितीय

बा-हाळी-प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना सन २०२४- २५ मध्ये घेण्यात आलेल्या तालुका स्तरीय पाककृती स्पर्धेत श्री संत कैकाडी महाराज प्राथमिक शाळा बा-हाळीने द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. मुखेड तालुक्यातील बा-हाळी येथील श्री संत कैकाडी महाराज प्राथमिक शाळेतील शालेय विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय पाककृती स्पर्धेत सहभाग नोंदविला दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी पंचायत समिती मुखेड येथे पाककृती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेत शालेय पोषण आहार विभागाकडून प्राप्त झालेले कडधान्य ,परसबागेत आलेला भाजीपाला यांचा वापर करून पाककृती तयार करण्याची स्पर्धापंचायत समिती मूखेड येथे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये केंद्रातून प्रत्येक दोन शाळेचा यात समावेश करण्यात आला होता. या पाककृती स्पर्धेत श्री संत कैकाडी महाराज प्राथमिक शाळेने सहभाग नोंदवित द्वितीय क्रमांक पटकाविला आहे .सहशिक्षिका वल्लपवाड पि.व्हि.,स्वयंपाकी पवार एस.एच. यांनी केंद्र प्रमुख श्रीपाद वाडीकर ,मूख्याध्यापक यशवंतराव अस्वले यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेत द्वितीय क्रमांक पटकावला. गटशिक्षणाधिकारी कैलास होणधरणे, विस्तार अधिकारी शिवाजी येवतीकर,केंद्र प्रमुख श्रीपाद वाडीकर यांनी अभिनंदन केले आहे.

स्वाधार रक्कमेत वाढ करा : कृती समिती

नांदेड-भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या रक्कमेत महागाई भत्तेनुसार वाढ करण्यात यावी व अन्य मागण्यासाठी आज फुले, शाहू,आंबेडकर विद्यार्थी कृती समिती नांदेड महाराष्ट्र राज्य तर्फे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री मा.अजित दादा पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली निवेदनात असे नमूद करण्यात आले की स्वाधार योजनेच्या आर्थिक मदतीत वाढवावी कारण सध्याच्या वाढत्या महागाईच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना दिली जाणारी आर्थिक मदत ही अपुरी ठरत आहे, स्वाधार योजनेची अंमलबजावणी तालुकास्तरावर त्वरित करण्यात यावी, एक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी देखील ही योजना लागू करावी जेणेकरून अल्पकालीन व्यवसायिक अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील योजनेचा लाभ मिळू शकेल, ५०% गुणाची जाचक अट रद्द करण्यात यावी, शैक्षणिक वर्ष २३२४ पर्यंत प्रलंबित असलेली रक्कम तात्काळ विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करावी. यावेळी प्रा.प्रबुद्ध चित्ते, वाठोरे लक्ष्मण, इंगोले प्रकाश, कुणाल भुजबळ,ड संतोष गायकवाड,सचिन गुंडेराव यांची उपस्थिती होती.

मुदखेड शहरात संत रविदास महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी

मुदखेड-शहरातील संत रविदास महाराज चौक याठिकाणी संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची ६४८ वि जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व प्रथम संत सेवालाल महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, संत शिरोमणी गुरु रविदास महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, संत ककय्या महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पपुजा व धुप पुजा करण्यात आली. यावेळी चंद्रप्रकाश देगलुरकर, माधव गायकवाड, पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक वसंत सप्रे, सहाय्यक पोलिस निरिक्षक बि. आर. कांबळे, स. पो. नि. शिवाजी शिंदे, भाजपचे महामंत्री प्रविण गायकवाड, कॉग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, माधव कदम, संजय सोनटक्के,लक्ष्मण देवदे, शिवसेनेचे पिंटू पाटील वासरीकर, सचिन चंद्रे, मुजीब पठाण, बालाजी खटिंग, उमाकांत घोंगडे, कुणाल चौदंते, रावसाहेब चौदंते, गिरिष कोत्तावार, प्रकाश सुर्यवंशी, शिवा तरोडेकर, यांची उपस्थीती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्ता सोनटक्के, बालाजी सोनटक्के, गजानन सोनटक्के, धारबा सोनटक्के, पप्पु जोगदंड, बालाजी देशमाने, प्रदिप अन्नपुरने, तानाजी सोनटक्के, ओम सोनटक्के, न्यानु काबळे, शुभम सोनटक्के, भगवान दुधंबे, सुभाष दुधंबे, बाळु काबळे, यांनी परिश्रम घेतला होता.

श्री क्षेत्र उमरज येथे छत्रपती शिवराय यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे आमदार चिखलीकर यांच्या हस्ते आनावरण

तभा वृत्तसेवा
कंधार,दि. २८ फेब्रुवारी

तालुक्यातील धाकटे पंढरपूर म्हणुन प्रसिध्द आसणारे श्री क्षेत्र उमरज येथे बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवराय यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे आनावरण सोहळा कार्यक्रम कंधार-लोहा मतदार संघाचे आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर यांच्या शुभहस्ते नुकताच संपन्न झाला . महाराष्ट्रात प्रसिध्द आसणारे धाकटे पंढरपूर म्हणुन संबोधल्या जाणारे श्री क्षेत्र उमरज येथे दिनांक २७ फेब्रुवारी रोजी पासुन १०८ कुंडी यज्ञ व कलशारोहण कार्यक्रमा निमित्त भारतातील प्रसिध्द आसणारे भागवताचार्य देवकीनंद ठाकुर यांच्या भागवत कथा प्रारंभ झाली

याचेच औचीत्य साधुन बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवराय यांचा आश्वारुढ पुतळा आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर यांच्या योगदानातुन उभारण्यात आलेल्या आश्वारुढ पुतळ्याचे आनावरण सोहळा आमदार चिखलीकर यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी माजी जि.प.सदस्य बाबुराव गिरे, हंसराज बोरगावकर, स्वप्नील लुंगारे, सोपानराव लोंढे, व्यकटराव मामडे , बाबुराव केंद्रे, भगवानराव मुंडे, पंडीत फाजगे, प्रल्हाद फाजगे यांच्यासह गावातील विनोद तोरणे, परसराम तोरणे, नवनाथ तोरणे, विलास सांगवे, शंकर भुत्ते जनार्धन केंद्रे, गिरीष देशपांडे, गोविंद भुत्ते , राजेश भुत्ते, रूषी तोरणे, एकनाथ तोरणे, काशिराम तोरणे, बालाजी तोरणे, शञुगण तोरणे, विशाल भुत्ते, शामराव गायकवाड, दशिवाजी गुट्टे, माधव भुत्ते आदींची उपस्थितीती होती. यावेळी गावातील शिवभक्तांनी आमदार चिखलीकर यांचे आभार मानुन स्वागत केले .

शासकीय योजनांच्या अंमलबजावणी आढावा समितीच्या सदस्यपदी डॉ.प्रभाकर जाधव

तभा वृत्तसेवा
धर्माबाद ,दि. २८ फेब्रुवारी

येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ.प्रभाकर जाधव यांची शासकीय योजनांचा गाव पातळीवर होणाऱ्या अंमलबजावणीचा फायदा नागरिकांना होत आहे की नाही? यासंदर्भातील संशोधनात्मक आढावा घेण्यात येणाऱ्या, आढावा समितीच्या सदस्यपदी दि.१० फेब्रुवारी रोजी निवड करण्यात आली. सदरील निवडीचे पत्र नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वतीने डॉ.प्रभाकर जाधव यांना देण्यात आले असून, सदरील ह्या निवडीबद्दल संस्थेचे सचिव डॉ. कमलकिशोर काकाणी, उपाध्यक्ष तथा सहसचिव नागभूषण वर्णी, कोषाध्यक्ष महेंद्रकुमार पांडे, संचालक विश्वनाथ पाटील बन्नाळीकर, उमेशकुमार झवर, नागनाथ नोमुलवार, प्रा. डॉ. कमलाकर कनसे, उपप्राचार्य डॉ.योगेश जोशी यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने डॉ.प्रभाकर जाधव यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

माहूर नगर पंचायतचा ९५ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मंजुर

तभा वृत्तसेवा
माहूर,दि. २८ फेब्रुवारी

नगर पंचायत माहूरच्या सभागृहात शुक्रवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी नगराध्यक्ष फिरोज कादर दोसानी यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्याधिकारी विवेक भारत कांदे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर नारायण लाड यांच्यासह ईतर सदस्यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय विशेष सभेत सन २०२५-२६ चा रक्कम रुपये ९५ कोटी ०५ लाख ५८ हजार ७०२ एवढ्या रक्कमेचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात असून ,सोबतच रक्कम रुपये ८ लक्ष ८८ हजार ६३७ रुपयांचा शिल्लकी अर्थसंकल्प देखील मंजूर करण्यात आला.

दिनांक २८ फेब्रुवारी रोजी नगर पंचायत माहूरच्या सभागृहात अर्थसंकल्पीय विशेष सभा संपन्न झाली. या सभेत सन २०२५-२६ साठीच्या अर्थसंकल्पाचे सविस्तर वाचन लेखापाल वैजनाथ स्वामी यांनी केले. अंदाजपत्रकानुसार नगर पंचायत माहूरला दर व करापासुन १ कोटी ८१ लाख ७ हजार ४००, विशेष वसुलीतुन ४५ लाख ३२ हजार, महसुली उत्पन्नातुन ३ कोटी ८३ लाख ९६ हजार ३४०, शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातुन ७९ कोटी ७७ लाख ७९ हजार ५००, संकीर्ण वसुलीतुन ८१ लाख ४८ हजार ४३९, दलित वस्ती अनुदान व ईतर यामधुन ८ कोटी ३६ लाख ७४ हजार ६०० व प्रारंभिक शिल्लक ८ लाख ९ हजसा ६० रुपये यासह नगर पंचायत माहूरला ९५ कोटी १४ लाख ४७ हजार ३३९ एवढा निधी अंदाजीत जमा होणे अपेक्षित असल्याच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. तर नगर पंचायत माहूरने विविध विकास कामासाठी खर्च बाजुला सामान्य प्रशासन व वसुली विभागासाठी १ कोटी ४६ लाख २० हजार ८५०, सार्वजनिक सुरक्षीततेसाठी ३ कोटी ८ लाख ४८ हजार ५००, शहरातील नागरीकांसाठी रस्ते, नाली बांधकामे, सांस्कृतिक सभागृह बांधकामे विविध चौकांचे सुशोभिकरण करणे व ईतर बांधकामे तसेच आरोग्य व सेवा देणेसाठी ७९ कोटी २७ लाख ३० हजार ४४०ग्रंथालय विभागासाठी ७ लाख ४२ हजार ७३३, संकीर्ण कामांसाठी २९ कोटी ५२ लाख ३ हजार २०९ तसेच दलित वस्ती भागातील सांस्कृतिक सभागृह कामे व ईतर कामांसाठी ८ कोटी २० लाख ९२ हजार ९७० असे एकूण ९५ कोटी ५ लाख ५८ हजार ७०२ एवढ्या अपेक्षित खर्च करण्याच्या तरतुदी असलेला व रक्कम रुपये ८ लक्ष ८८ हजार ६३७ एवढया रक्कमेचा शिल्लकी अर्थसंकल्प या सभेत मंजुर करण्यात आला.

सदर अर्थसंकल्पावर सविस्तर चर्चा करण्यात आली.या चर्चेत नगराध्यक्ष फिरोज कादर दोसानी, मुख्याधिकारी विवेक भारत कांदे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर नारायण लाड, विद्यमान सदस्य तथा माजी नगराध्यक्ष राजेंद्र नामदेवराव केशवे, सदस्य तथा काँग्रेस पक्षाचे गटनेते विलास बालाजीराव भंडारे, सदस्य तथा शिवसेना पक्षाचे गटनेते श्रीमती आशाताई निरधारी जाधव,सदस्य भाजपाचे गटनेते सागर सुधीर महामुने, तसेच सदस्य श्रीमती नंदा रमेश कांबळे,विजय शामराव कामटकर, श्रीमती सारीका देविदास सिडाम, श्रीमती शकिलाबी शब्बीर सैय्यद,श्रीमती लतिफा मस्तान शेख, श्रीमती सागर विक्रम राठोड, श्रीमती बिलकीस बेगम अहमंद अली शेख, अशोक कचरु खडसे, श्रीमती शीला रणधीर पाटील यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभाग नोंदविला. या अर्थसंकल्पा मध्ये विशेष प्राधान्याने विविध महापुरुषांची स्मारके विकसीत करणे, तिर्थस्थळांना जाणारे रस्ते विकसीत करणे,विकास योजनेतील रस्ते भुसंपादन करुन विकसीत करणे, मोठया नाल्याचे बांधकाम करुन शहरातील पाणी शहराबाहेर काढणे, ओपन स्पेस विकसीत करणे, उद्यान निर्मिती करणे,न. पं.प्रशासकीय इमारत बांधकाम करणे,वाचनालयाचे बांधकाम करणे, असे अनेक विकास कामे करण्याच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. शेवटी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले आणि चहा-पाना नंतर अर्थसंकल्पीय सभा संपल्याचे जाहीर केले. यावेळी नगर पंचायतचे लेखापाल वैजनाथ स्वामी,लेखापरिक्षक विशाल मरवाडे, उडढउ विशाल ढोरे, उ.उ.मजहर शेख, सुरेंद्र पांडे, व ईतर कर्मचारी उपस्थित होते.

मुदखेड-खासदार रवींद्र चव्हाण हे मुदखेड येथे आले असता माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोत्तावार यांच्या निवासस्थानी त्यांनी भेट दिली. यावेळी खासदार रवींद्र चव्हाण यांच्यासह पप्पू पाटील कोंडेकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी काँग्रेस कमिटीचे तालकाध्यक्ष प्रतापराव देशमुख बारडकर, लक्ष्मण देवदे, उबाठा शिवसेना तालुका प्रमुख पिंटू पाटील वासरीकर, संपादक अजगर हुसेनसाब, गिरीश कोत्तावार, सचिन चंद्रे, अंकुश मामीडवार, युवक काँग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठाण यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विक्रम नागशेट्टीवर यांचा अजित पवार गटात प्रवेश

तभा वृत्तसेवा
देगलूर,दि. २८ फेब्रुवारी

तालुक्यासह नांदेड जिल्ह्यात सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले आणि गोरगरिबांच्या मदतीसाठी सतत पुढाकार घेणारे युवा नेतृत्व विक्रम नागशेट्टीवार यांनी नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षात प्रवेश केला. विक्रम नागशेट्टीवार हे शरद पवार गटाचे युवक जिल्हा कार्याध्यक्ष तसेच उदगीर - जळकोट विधानसभेचे निरीक्षक म्हणून अतिशय उत्कृष्ट काम पाहिले परंतु आपल्या भविष्याचा वेध घेत विक्रम यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश घेत त्याच्या चाहत्याही सुद्धा त्याच्या सोबतच राहण्याचा निर्णय घेतला असून विक्रम नागशेट्टीवार यांच्या सोबत राहून देगलूर मध्ये नवा विक्रम घडवू असे म्हणत राष्ट्रवादी ची घड्याळ आपल्या हातात बांधली.

माजी खासदार तथा लोहा कंधारचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते त्यांचा पक्ष प्रवेश साई सुभाष जनसंपर्क कार्यालय, वसंतनगर, नांदेड येथे पार पडला. विक्रम नागशेट्टीवार यांच्या पक्षप्रवेशामुळे देगलूर तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव युवा वर्गातही वाढण्याची शक्यता आहे. त्यांच्या प्रवेशानंतर विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, संस्कृतीक अशा विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. प्रताप पाटील चिखलीकर, दिगंबर कौरवार आदी उपस्थित होते.

नांदेड जिल्ह्यात एकाच दिवशी ८० हजार घरकुलांचे भूमिपूजन

ऐतिहासिक विक्रम

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २८ फेब्रुवारी

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत नांदेड जिल्ह्यात आज एकाच दिवशी तब्बल ८० हजार घरकुलांचे भूमिपूजन करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमामुळे नांदेड जिल्ह्याने ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे.

या भव्य उपक्रमाच्या शुभारंभी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांच्यासह जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचे खाते प्रमुख उपस्थित होते.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत नांदेड जिल्ह्यासाठी १ लाख ४९ हजार ७३१ लाभार्थ्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यापैकी १ लाख ३९ हजार ५१७ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी देण्यात आली आहे. दिनांक २२ फेब्रुवारी रोजी देशाचे गृहमंत्री ना. अमित शहा व राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्रातील २० लाख घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वाटप तर १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित केला आहे. उर्वरित लाभार्थ्यांचे खाते पडताळणी सुरू असून लवकरच त्यांनाही निधी वितरित करण्यात येणार आहे.

विहित मुदतीत घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्याचा निर्धार

मंजूर घरकुलांचे विहित मुदतीत बांधकाम पूर्ण करण्यासाठी व लाभार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी नांदेड जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये आज भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवस उपक्रमांतर्गत ही घरकुले पूर्ण करण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी केले आहे. ग्रामपंचायत स्तरावर गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी नियोजनबद्ध पद्धतीने हा उपक्रम यशस्वीपणे राबवला. इतिहासात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर घरकुल मंजुरी देण्यात आली आहे.

पत्रकारांचा सन्मान

तभा वृत्तसेवा
निवघा बा,दि. २८ फेब्रुवारी

हादगाव तालुक्यातील लिंगापूर येथिल पत्रकारांना उत्कृष्ट कामगीरी बाबत पत्रकार संदिप तुपकरी, संदिप वानखेडे, संतोष वाघमारे, महेश पाटील बोरकर, बाळराज काळबांडे यांना पुरस्कार देण्यात येणार आहे. दि. ०३ मार्च रोजी सायंकाळी ७ वा लिंगापूर येथे मान्यवराच्या हस्ते सदर पुरस्कार देण्यात येणार आहे.

कार्यक्रमासाठी हास्यसम्राट विनोदाचा बादशहा दिपक देठे हे उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमाचे अध्यक्ष अभिजीत मुळे तर प्रमुख पाहणे म्हणून डॉ. सचिन सूर्यवंशी, अनिल कदम, माधवराव देवसरकर, भागवत देवसरकर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अभिजीत देवसरकर यांनी केले आहे.

आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

आनंदाचे 'कारक' रांगोळी

'होते अंगण गोमये सकलही संमार्जिले सुंदर,
बालार्के अपुली प्रभा वितरली नेत्रोत्सवा त्यावर
तीची जी भगिनी अशी शुभमुखी दारी अहा पातली,
रांगोळी मग त्या स्थळी निजकरे घालावया लागली

प्रसन्नतेचे रंग लेवून दारी स्वागताला सज्ज असणारी रांगोळी साऱ्यांचेच मन उल्हासित करते. भारतीय स्त्री मनाची आनंदी सखी म्हणजे रांगोळी! विविधतेत एकता हे सिद्ध करत प्रत्येक प्रांतियांच्या अंगणाचे सौंदर्य वाढवते. भारतीय संस्कृतीची सुंदर ओळख करून देत, वातावरण निर्मिती किती सहजतेने करते ना! गृहिणीच्या दिवसाचा प्रारंभ सकारात्मक ऊर्जेने होण्यासाठी रांगोळी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. अंगणातील रांगोळी, देवघरासमोरची रांगोळी, ताटापाटाभोवतीची रांगोळी अशी अनेक प्रसंग खुलवणारी रांगोळी आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. रांगोळी कलासक्त मनाला साद तर घालतेच पण ती बालमनालाही भुरळ घालते.

रांगोळी एक सुंदर कला आहे. काळानुरूप रांगोळीत अनेक बदल होत आहेत. परंतु, आनंदाने स्वागत करण्याचा आपला धर्म मात्र ती बदलत नाही. शुभचिन्हांनी पावित्र्य, सात्विकता वाढवत ती घर-आंगणास आनंदाने भारून टाकते.

'आदित्यादिक आकृती सुचविती दिव्यत्व ते उज्ज्वल,
तैसे स्वस्तिक सूचवी सफलता धर्मार्थकामांतिल
पावित्र्याप्रत गोष्पदे, तुळसही, शोभेस ही सारसे,
पुष्पे प्रीतिस, चक्र हे सुचविते द्वारी हरी या असे!

लहान बालकांना रांगोळीच्या रंगांतूनच रंगांची ओळख होते. मोहक अन् आकर्षक रंगसंगती बघून ते सुद्धा आनंदित होतात. रांगोळीचे रंग, स्पर्श वेगळीच अनुभूती देवून जातात. कलेचे दालन सहजच त्यांच्या पुढ्यात उघडले जाते. रांगोळी रेखलेले अंगण बघून मन तर प्रसन्न होतेच पण, काढणाऱ्या त्या व्यक्तीचे कौतुक केले तर, आनंदाचे चांदणे निश्चितच आपली कौमुदी पसरवते. अगदी साधी, छोटीशी पांढरी रांगोळीसुद्धा मन मोहून घेते. त्यावरच्या चिमूटभर हळदी-कुंकवाचा टिळा एखाद्या सौंदर्यवतीचे भाळ खुलवत असल्याचा भास करवतो.

रांगोळीचे किती प्रकार आहेत ना! सारेच विलोभनीय! ठिपक्यांची रांगोळी नकळत समतोल साधायला शिकवते. रांगोळी काढून झाल्यावर त्यावर एक नजर टाकली की, अरे वाह! आपलेच मन जेव्हा दाद देते तेव्हा दिवसभर मन आनंदाच्या झुल्यावर झुलते.

आपल्या संस्कृतीची ही अलौकिक देणगी भावी पिढीत आनंदाचे नकळत रोपण करते. सणसमारंभाच्या वेळी आई-आज्जी कोणीही रांगोळी काढत असली की, घरातील बच्चेकंपनी मुठीत रांगोळी घेऊन रांगोळी काढण्याचा जो आनंद मिळवतात तो अवर्णनीय सोहळाच असतो. त्यांच्या हातून सांडलेल्या रांगोळीने जो आकार घेतला तो त्यांना कलाकृतीचे समाधान मिळवून देत कलाप्रेमी बनवतो.

काळानुरूप रांगोळीचे प्रकार तर वाढतच आहेत. हा छंद एकटेपणाची हुरहूर कमी करून जीवनात सहजतेने आनंदाची हिरवळ निर्माण करत असतो. माझ्या परिचित ऐंशीहून अधिक वयाच्या एक आज्जी आहेत. रांगोळी त्यांचे करमणूक व आनंदाचे साधन आहे. वेळ जात नाही, करमत नाही, बोलायला कोणी नाही त्यावर त्यांनीच छानसा उपाय शोधून काढला.

घरात जी काय भाजी, फुले-पाने, धान्य, कडधान्ये असतील त्यापासून कलात्मक रांगोळी त्या रोज चक्क ओट्यावर किंवा टेबलवर काढतात. आपला आनंद शोधत त्यांचा जीवनप्रवास छान सुरू आहे. अगदी आत्मानंदी लीन होऊन त्यांनी आपले जगणे सुकर केले आहे. मग तर फेसबुकबाबावर अशा अनेक भगिनी भेटत गेल्या ज्यांना बिनाखर्चाने आनंदाचे निधान लाभत आहे.

काही जण इतकी सुंदर रांगोळी काढतात की, ही रांगोळी की फोटो? असा प्रश्न पडतो. ती त्यांची सातत्यपूर्ण कला साधनाच असते. साध्या रांगोळीपासून थ्रीडी रांगोळीपर्यंतचा हा प्रवास आनंदवर्धक आहे. रांगोळीसुद्धा सशक्त अभिव्यक्तीचे माध्यम आहे. निसर्गचित्र, सामाजिक प्रश्न कुठलाही विषय घेऊन रांगोळी काढली जाते.

आपल्या आराध्य देवतेची रांगोळी रेखाटणे हा तर अवर्णनीय आनंदाचा क्षण असतो. पाण्यावरची रांगोळी हे तर आणखी वेगळेच कौशल्य! ओणम, पोंगलच्या वेळेस काढल्या जाणाऱ्या फुलांच्या आखीवरेखीव सुंदर आणि भव्य रांगोळ्या कवी केशवसुत म्हणतात त्याप्रमाणे, डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या नेत्रोत्सवी ठरतात. संस्कार भारतीच्या नजरेत भरणाऱ्या रांगोळ्या प्रसन्नतेचे दीप उजळतात. सौंदर्याचा साक्षात्कार व मांगल्याची सिद्धी साधणाऱ्या रांगोळीला म्हणूनच तर संस्कृत भाषेत रंगवल्ली म्हटले जाते. विविध नावांनी, वैविध्याने नटलेली रांगोळी आपण रोजच बघत असलो तरी शांत चित्ताने तिच्याकडे बघितले की, आनंदी संप्रेरके स्त्रवतातच! विविध परिषदा, प्रदर्शने, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील कार्यक्रम असो वा मिरवणूक अथवा पालखीचे स्वागत चित्ताकर्षक रांगोळीने वातावरण निर्मिती होत, आनंदाचे तोरण नकळत बांधल्या जाते.

साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे,
नित्याच्या अवलोकने जन परी होती पहा आंधळे!
रांगोळी बघुनी इत:पर तरी होणे तयी शहाणे,
कोठे स्वर्गसमक्षता प्रकटते ते नेहमी पाहणे!

सध्याचे 'हुश्शार' लग्नाळू!

गौरी बेलन/ ९८८११०४११२



लग्नाला फक्त एक महिना शिल्लक होता. ऐश्वर्या आणि समीरचं लग्न मोठ्या दिमाखात साजरे करण्यासाठी दोन्हीही पक्ष हौशीने तयारीला लागलेले होते. ऐश्वर्या एकुलती एक असल्याने तिच्या आई-बाबांनी कुठेच काटकसर न करता लग्नासाठी मोकळा हात सोडला होता. नोकरीच्या निमित्ताने हे दोघे मुंबईत असल्याने लग्नापर्यंतचा निवांत वेळ फिरण्यासाठी आणि एकमेकांना समजून घेण्यासाठी मजेत घालवीत होते. मोठ्या उत्साहाने लग्नाची खरेदीसुद्धा दोघांची बरोबरीने चाललेली! 'समीर, तू ना व्हाईट कलरचा सूट घाल रिसेप्शनला! आपण तो घेऊ या! पण, समीरचा आवडता मेटॅलिक कलर! तो म्हणाला,'मी सूट मेटालिकच कलरचाच घालणार, माझं स्वप्न होतं हे!'

'हे रे काय ? मी तर व्हाईट कलरचा लाछा घेतला आहे. एवढा महागडा लाछा आता मी कसा बदलणार? तूच बघ आता काहीतरी,' ऐश्वर्या अडून होती. दोघेही आपापल्या निर्णयावर ठाम होते. थोडक्यात त्यादिवशीची संध्याकाळ संवाद न होताच 'सूट'च्या रंगावरून संपूर्ण वादातच गेली आणि हा वाद विकोपाला जाऊन दोघांनीही निर्णय घेतला की, आपण एकमेकांसाठी तडजोड करूच शकत नाही. तेव्हा आपलं जमणं अशक्य आहे, असं सांगून चक्क मोकळे! आहे ना मजा...! अवघ्या एक महिन्याच्या अंतरावर असलेल्या लग्नाच्या आनंदावर विरजण पडलं.

वाचक हो, स्वत:च्या इच्छाआकांक्षांना किती व्यापक स्वरूप प्राप्त करून, युवा पिढी कोणताही टोकाचा निर्णय घेऊ शकते, हे दुर्दैव आहे. समाजात आसपास कितीतरी लहान सहान कारणावरून लग्नाची गाडी रखडल्या जाते आहे.

सुरुवातीला तर स्थळ निवडून ते परस्परांपर्यंत पोहचवण्यासाठीच कितीतरी जण अहंकाराचा बुरखा घालून संशोधनासाठी सिद्ध होतात. लग्न दोन जीवांचं होणार असतं पण, या दोन जीवांना एकत्र आणण्यासाठी कुटुंबातील सदस्यांनी अपेक्षित कल्पनांचा डोलारा रचलेला असतो. कागदावरचा एक काळा ठिपकाच सर्वप्रथम निदर्शनास येतो आणि बाकीचा शुभ्र कागद नजरेआड होतो.

शिक्षण, करियर यानंतर आयुष्यातील महत्वाचा टप्पा म्हणजे विवाह! पण, विवाह म्हणजे काय तर मोठा समारंभ, विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम, चमचमीत पदार्थांची रेलचेल, दागदागिने आणि कपड्यांची मनमुराद खरेदी आणि पाहुण्यांच्या कौतुकासाठी आसुसलेली नजर...लग्न म्हणजे काय तर दोघांनी एकत्र येऊन सहजीवन सुरू करणे आणि आपली नोकरी-व्यवसाय सांभाळून वीकेंडला वेळ काढून शॉपिंग, एखादी मूव्ही, नाटक बघणे, हॉटेलिंग नाही तर पिकनिक! झालं...हेच वैवाहिक जीवन! ही तरुण पिढीची भन्नाट संकल्पना झालेली!

लग्नानंतर करावी लागणारी तडजोड, वाढणारी जबाबदारी, शारीरिक-मानसिक बदल, आर्थिक गोष्टींचा ताळमेळ या गोष्टीबद्दल किती जण मुक्तपणे संवाद साधतात, हे जरा कोडंच आहे. खरंतर याच गोष्टी अतिशय महत्त्वाच्या आहेत. घरातील मोठ्या मंडळींनी किंवा नातलगांनी विवाहेच्छुकांना समोरासमोर बसवून याच गोष्टीवर खुली चर्चा केली तर, अशा छोट्या गोष्टींवरून लग्न अडणार नाही, असं मनापासून वाटतं. थोडक्यात संवादाने बऱ्याच गोष्टी साध्य होऊ शकतात.

सांस्कृतिक आणि सामाजिक संक्रमणाच्या बदलत्या परिस्थितीत मुलींमधले शिक्षणाचे आणि सुधारणांचे वारे जोमाने पसरले. स्वत:चं अस्तित्व जर टिकवायचं असेल तर, शिक्षण आणि अर्थार्जन या दोन्ही गोष्टी अत्यावश्यक आहेत, याची मुलींना जाणीव झाली. त्यामुळे, सर्वच क्षेत्रात मुली, मुलांच्या बरोबरीने भरारी मारता-मारता कधी त्यांच्या पुढे गेल्या, हे मुलांना कळलंसुद्धा नाही.

नोकरी नसलेल्या मुलीला लग्नाच्या बाजारात त्रास हा होतोच. गेल्या ५-६ वर्षांपासून तर मुली कशी का होईना पण, नोकरी मिळण्यासाठी अतिशय मेहनत करीत आहेत. नोकरीशिवाय मी लग्न तरी कसे करू?आणि माशी शिंकते ती नेमकी इथेच! इथेच लग्नाचं वय वाढतं आणि नोकरी नसलेल्या मुलींना मुलाकडचेही फारसे होकार देत नाहीत. मुलगीही स्वत: लग्नासाठी सिद्ध होत नाही. स्पष्टपणे हेच सुचवावंसं वाटतं की, लग्न जुळवताना जर मुलगी वयाने लहान असावी, नवऱ्याचा मान जपणारी हवी हे आपल्या संस्कृतीला मान्य आहे. मग लग्नाच्या वेळेस मुलींचं अर्थार्जन असावंच, अशी अपेक्षा जरा लवचिक ठेवली तर! तिच्या शिक्षणाला प्राधान्य देऊन मुलगी बघितली तर...कारण, मुलांच्या मतांचा विचार बघता अजूनही म्हणावी तशी पुरुषी मानसिकता बदलेली नाही. त्यांना पारंपरिक पद्धतीने नोकरी करून, घर उत्तमरीत्या सांभाळणारी बायको हवी असते. गर्लफ्रेंड म्हणून ॲडव्हान्स विचारांची, मॉडर्न, मेकअप करणारी मुलगी चालेल. परंतु, आयुष्याची जोडीदार ही सात्विक आणि मेहनती असावी असं ९० ते ९५ टक्के मुलांच्या बोलण्यातून जाणवतं. सध्याच्या तरुणाईच्या चर्चेचा सूर बघता, आपल्या आयुष्यात येणारी मुलगी-मुलगा, त्यामुळे वाढणारं कुटुंब, नातेसंबंधांची जबाबदारी घेण्याची त्यांची फारशी मानसिकता नाही. आयुष्याचा जोडीदार हा आर्थिकदृष्ट्या सबळ असावा. पण, त्याच्यावर खूप जास्त घरची जबाबदारी नसावी, असं स्पष्ट बोललं तरी कसं जातं? मनुष्याला कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी चढउताराचे प्रसंग आयुष्यात हवेच असतात की ! उच्चशिक्षित मुलींना घरातील सणसमारंभ साजरे करणं अवघड वाटतं. त्यासाठीचे परिश्रम करण्याची तयारी खूपशी नाहीच. वेळप्रसंगी थोडंसंच वरवरचं करणं, छान छान तयार होणं आणि खूप कौतुक करून घेणं, फोटो काढणं असं वाटणाऱ्या मुली सध्या जरा जास्तच! बऱ्याच मुलांनाही स्वत:च्या नोकरी करणाऱ्या बायकोला घरी भरपूर आराम मिळावा. यासाठी त्याच्या आईवडिलांनी तिला संपूर्ण सपोर्ट करावा, असंही चित्र समाजात जास्त आढळून येतंय. प्रत्येक जण शिक्षणाच्या भरवशावर हुशार झाला आहे. परंतु, ही हुश्शारी फक्त 'स्व'अस्तित्व□ म्हणजे इंडीव्हिज्युअल स्पेस सांभाळण्यासाठी उपयोगी आणतात. विद्येने येणारं शहाणपण उपयोगी न ठरता घातकच ठरेल की काय, अशी जुन्या पिढीला भीती वाटायला लागली आहे. पूर्वी प्रत्येकाची वेगळी स्पेस वगैरे नसत्याने 'तुझं माझं सारं काही एक','जीवनात येऊ दे अडचणी अनेक' या तत्वावर वैवाहिक आयुष्य सुखी, समाधानी आणि आनंदी रहायचं! शिकून सवरून जर आपण हुशार झालो आहोत तर ही 'हुश्शारी' आपण चांगल्या प्रकारे कशी सिद्ध करू शकू? हे जर तरुणाईला कळलं तर, वैवाहिक क्षेत्रात निश्चितच वैचारिक क्रांती घडू शकेल. शेवटी वैवाहिक आयुष्य जगतांना हेच जुन्या पिढीकडून सांगितलं जातं की, आवश्यकतेपेक्षा जास्त मिळणं म्हणजे नशीब, सर्वकाही असूनही जे रडवतं ते दुर्दैव आणि थोडंफार मिळूनही आनंद मिळतो ते म्हणजे आयुष्य! मग अशा आयुष्याचा ध्यास माझ्या तरुण मित्रमैत्रिणींनो तुम्ही पण घ्याल ना?

भावना कळायला मन लागतं,
वेदना कळायला जाणिव लागते
माणूस कळायला माणुसकी लागते,
लग्न जुळवायला सुंदर विचार लागतात...

अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६

रोडगा वाहीन तुला...

शीर्षकावरूनच तुम्हाला कळलं असेल की, आज आपण मराठी काव्याचाच एक प्रकार भारूड याचा विचार करणार आहोत. भारूड म्हणजे काय हा सर्वसामान्यांना पडणारा प्रश्न?आध्यात्मिक आणि नैतिक शिकवण देणारे मराठीतील रूपकात्मक नाट्यगीत म्हणजे भारूड! ही भारूडे भागवतात आहेत. तसेच, लोकगीत आणि शाहिरी साहित्यातही काही वेळा आढळतात. यात रूपक हे महत्त्वाचे आहे. महालक्ष्मी, भवानी, खंडोबा या दैवतांचे उपासक, वारकरी, महानुभाव, नाथपंथीयांचे अनुयायी, आंधळा, बहिरा, पांगळा, भिक्षेकरी, ज्योतिषी, भटजी इत्यादी व्यावसायिक, डोंबारी, कोल्हाटी, जादुगार, बहुरूपी असे लोककलावंत! दळण, कांडण, बाजार, वृश्चिकदंश इत्यादी प्रसंग, नवस, हळद लावणे वगैरे नैमित्तिक विधी, टिपरी, भोवरा, हुतुतू, पिंगा असले खेळ, एडका, कुत्रा, बैल, टिटवी वगैरे पशुपक्षी अशा अनेक विषयांवर ही भारूडे लिहिली गेली आहेत.

अशा प्रकारची रचना संत ज्ञानदेव, संत नामदेव या संत एकनाथपूर्व, तसेच त्यांच्यानंतर संत तुकाराम, संत रामदास यांनीही केलेल्या आहेत. मात्र, संत एकनाथ महाराजांची भारूडे एवढी लोकप्रिय झालेली आहेत की, भारूड म्हणजे ती संत एकनाथ महारांजीच हा समज रूढ झाला आहे. संतांच्या अनेक रचनांमध्ये रुपके आहेत. पण, भारूड हा प्रकार काहीसा वेगळा आहे. रचनात्मकदृष्ट्या विचार करायचा झाल्यास हा प्रकार ओवी किंवा अभंगाच्या अंगाने जात नाही तर, गीताच्या अंगाने जातो. म्हणजे आधी एक ध्रुवपद आणि नंतर २/३/४ किंवा त्याहूनही अधिक कडवी यात असतात. आलंकारिक अंगाने बघितले तर यात रूपके आहेत. रूपकाच्या चमत्कृतीने आधी श्रोत्यांचे लक्ष वेधायचे, त्या रूपकाचा उलगडा करण्यात त्याला गुंतवायचे आणि शेवटी त्यातील आध्यात्मिक-नैतिक आशय त्यांच्या मनात उतरावायचा, हे कार्य अशी रुपके उत्कृष्टपणे करतात. गवळण/विराणी यातही रूपक असतं परंतु, ते आध्यात्मिक आणि नैतिक शिकवणीसाठी! त्यातील भक्तीची आर्तता मोठी असते. म्हणूनच, ती भारूडाहून वेगळी असते. पुढे ते येणार आहेच.

भारूड हा एक मराठी पद्यवाङ्मयाचाच प्रकार आहे. याद्वारे साध्या रूपकांतून धार्मिक आणि नैतिक तत्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्याचे कार्य केलेले आहे. याद्वारे समाज प्रबोधनाचे मोठेच कार्य संतांनी केले आहे. संत एकनाथ महाराजांची भारुडे लोकप्रिय होण्याची प्रमुख चार कारणे सांगता येतील. पहिले म्हणजे त्यांच्या भारूडांत वैविध्य आहे. दुसरे कारण त्यातली नाट्यात्मकता! तिसरे कारण विनोद आणि चौथे महत्वाचे कारण म्हणजे त्यातली गेयता! इतर संतांनीही भारूड रचना केली आहे पण, त्यामधे फारशी विविधता सापडत नाही. संख्येनेही ती भारूडे कमी! संत एकनाथ महाराज नित्यनैमित्तिक कर्म 'विधीगौरवे शृंगारोनी' अशाप्रकारे आचरणारे! सांसारिकांची सुखदु:खे, इच्छा-आकांक्षा, आवडी-निवडी याविषयी जिव्हाळा असणारे! त्यामुळे, सामान्यांच्या जीवनाशी ते सहज समरस होत.

आपण महाराजांचे एक सर्वश्रुत भारूड बघू या.

सत्वर पाव गे मला ।
भवानी आई रोडगा वाहीन तुला ॥१॥
सासरा माझा गावी गेला ।
तिकडेच खपवी त्याला ॥२॥
सासू माझी जाच करते ।
लौकर निर्दाळी तिला ॥३॥
जाऊ माझी फफडफफड बोलती ।
बोडकी कर गं तिला ॥४॥
नणंदेचं कार्ट किरकिर करतं ।
खरूज होऊ दे त्याला ॥५॥
दादला मारून आहुती देईन ।
मोकळी कर गं मला ॥६॥
एका जनार्दनी सगळेच जाऊ दे ।
एकलीच राहू दे मला॥७॥

वरवर बघता हे भारूड तत्कालीन सून वायरीच्या मनातलं बोलणारे आहे. हे वाचताना एक गोष्ट लक्षात येते की, या सात कडव्यांत एकाही ठिकाणी माहेरच्या नात्यांचा उल्लेख नाही. लहानशा वयातली सून, तिला ज्या कुणाकडून सासुरवास होत असेल, तीच नावे यात आहेत. कदाचित म्हणूनच हे भारूड अनेकांना आवडलं असावं. पण फक्त एवढ्यासाठीच महाराजांनी हे लेखन केलं का? तर नाही.

'जीवरूपी स्त्री, ही संसारात विविध प्रकारच्या तापांनी पोळली गेली. त्रिगुणाच्या पाशांनी आवळली गेली. पण, तिच्या पूर्वपुण्याईने जेव्हा तिला वैराग्य प्राप्त होते तेव्हा, तिला या संसाराच्या सर्व जंजाळातून मोकळे व्हावे, असे मनापासून वाटते आणि ती देवीला नवस बोलते. अशा या दु:खमुक्त होऊ पाहणाऱ्या स्त्री रूपकाचे वर्णन एकनाथ महाराजांनी 'नवस' या भारूडात केलेले आहे की, हे आदिशक्ती असणाऱ्या अंबे मी तुला काया, वाचा, मनाचा रोडगा वाहीन. मला सत्वर प्रसन्न हो! माझी देवबुद्धी जागेवर असल्यामुळे, माझा देह हा अहंकार रुपी सासरा परगावी गेलाय. म्हणजे तो देहात नाही. हे अंबे, तो अहंकार रुपी सासरा परत येण्यापूर्वीच त्याला तिकडेच खपव. म्हणजेच माझा देहाभिमान व्यर्थ आहे, याची मला जाणीव झाली आहे. ते तसेच राहू दे. पुन्हा मनाला तिकडे फिरू देऊ नकोस. कल्पना ही माझी सासू! ती अनेक संकल्प-विकल्प करून माझ्याकडून पापपुण्य करून घेते. त्यामुळे, माझा जीव खूप त्रासला आहे. याकरता, जगदंबे तिलाही नष्ट कर. इच्छारुपी जाऊबाईंच्या काम या नवऱ्याला तू मार, म्हणजे ती बोडकी होईल आणि मग तिच्या बोलण्याची फडफड एकदाची बंद होईल. ममता ही माझी नणंद! मला कधीच आनंद देत नाही अशी ही! तिचं कार्ट ते सारखं 'हे मला हवं ते मला हवं' म्हणून किरकिर करतं. ते मिळाले नाही की, भोकाड पसरतं. त्याला मनोनिग्रहाची खरूज होऊ दे म्हणजे, त्याची किरकिर थांबेल. अविवेक हा माझा नवरा आणि त्यामुळेच ही सगळी नाती निर्माण झाली आहेत. सगळेच मिथ्या माझ्या मागे लागलेले आहे. आता या अविवेकरुपी नवऱ्याची मी ज्ञानाग्नी आहुती देऊन टाकते. तरच मी या सगळ्यांपासून मोकळी होईन. उद्धाराची तीव्र तळमळ लागलेली ही जीवरुपी स्त्री शेवटी जगदंबेला विनवताना म्हणते,'हे जगदंबे हे परमेश्वरी, तुझ्या आणि माझ्या मीलनाच्या आड येणाऱ्या सर्व विकारांना घालवून मला एकटं राहू दे आणि तुझ्यामध्ये लीन करून घे. मी तुला सर्वस्व समर्पणाचा रोडगा वाहीन म्हणून तू मला प्रसन्न हो !' समाजाला समजेल अशा सोप्या भाषेत एकनाथ महाराजांची अनेक भारुड आपल्याला उपलब्ध झालेली आहेत. आपण त्याचा अभ्यास करू शकतो. एवढेच नव्हे तर इतर संतांचीही अनेक भारुडे आहेत. त्याचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. भारुड म्हणजे रूपकात्मक गाणं ज्यात अध्यात्मिक आणि नैतिक धडे आहेत. नाट्यमयता, विनोद आहे. विषय वस्तू अतिशय सकस आहे. यातूनच लोकशिक्षण हा उद्देश सफल! भारुडांच्या रचनेत अध्यात्म, मनोरंजन दोष दुर्गुणांचे भंजन आणि भक्ती हे सर्व आहे. भारुड लिहिण्याच्या प्रयोजनावरून आणि रचनेवरून एकनाथ महाराजांची ही भारुडे अध्यात्मिक उद्बोधन, प्रबोधन आणि लोकरंजन साधण्यासाठी केलेली रूपकात्मक रचना आहे. म्हणूनच संस्कृत साहित्यात जे स्थान पुराणांचे आहे तेच संत साहित्यात भारुडांचे आहे. विस्तारभयास्तव इथेच थांबते. पुढल्या भागात आणखी काही भारुडे घेऊन आपण भेटू या.

सागरा प्राण तळमळला!

सावरकरांचं लेखन वाचताना वैचारिक सुस्पष्टता पानोपानी भेटते, त्यांच्या चरित्रातून दृग्गोचर होते. 'मारिता मारिता मरेतो झुंजेन'वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी भारतमातेस परकीय दास्यातून मुक्त करण्यास्तव सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून अष्टभुजा देवीसाक्ष केलेली प्रतिज्ञा, सावरकरांच्या विचारांना निष्ठेची, कर्तृत्वाची, त्यागाची, पुरुषार्थाची असीम प्रभा आहे म्हणून त्यांचं लेखन स्फुल्लिंग चेतवतं ! स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी २६ फेब्रुवारी रोजी आहे. हे औचित्य साधून हा विशेष लेख...

सायली मोकाटे-जोग/ +१(८१८) ६२०-७११९

प्रखर देशभक्ती, अनन्यसाधारण प्रतिभा यांच्या मिलाफअसणाऱ्या सावकारांचं हे विलक्षण गीत संगीतबद्ध केल्याच्या 'गुन्ह्या'साठी पं. हृदयनाथ मंगेशकरांना 'ब्रिटिशां'पासून स्वतंत्र झालेल्या भारतात, आकाशवाणीच्या नोकरीला मुकावे लागले होते. अनेक क्रांतिकारांना स्वातंत्र्यलढ्यासाठी स्फूर्ती देणारे, जाज्वल्य देशाभिमान असणारे सावरकर असं रसायन आहेत की, ब्रिटिश त्यांना घाबरून होतेच पण, १९४७ नंतर आलेले काळे इंग्रज आणि त्यांचे वंशज आजही सावरकरांच्या नावाने भयभीत होतात.

सावरकरांचं लेखन वाचताना वैचारिक सुस्पष्टता पानोपानी भेटते, त्यांच्या चरित्रातून दृग्गोचर होते. 'मारिता मारिता मरेतो झुंजेन'वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी भारतमातेस परकीय दास्यातून मुक्त करण्यास्तव सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून अष्टभुजा देवीसाक्ष केलेली प्रतिज्ञा, सावरकरांच्या विचारांना निष्ठेची, कर्तृत्वाची, त्यागाची, पुरुषार्थाची असीम प्रभा आहे म्हणून त्यांचं लेखन स्फुल्लिंग चेतवतं !

जयोस्तुते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे,
स्वतंत्रते भगवती ! त्वामहं यशोयुतां वंदे

सावरकर वाचले की, 'विचार कशाशी खातात' हे उमगायला लागतं. प्रवाहाविरुद्ध पोहण्याची, काळ्या पाण्याला टक्कर देण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती सावरकरांच्या चरित्रातून मिळते. दुहेरी जन्मठेपेची शिक्षा झाल्यावर 'अंदमानातल्या तुरुंगाच्या भिंतीवर डोकं आपटून फुटून जाईल,' असं कुत्सितपणे हिणवणाऱ्या जेलर बेरीला 'तुरुंगाच्या भिंती फुटल्या, डोकं अजून शाबूत आहे,' या बाण्याने सामोरे जाणारे सावरकर अन्यायाविरुद्ध लागणारं अपार धैर्य आणि जिद्द देतात.

केला जरी पोत बळेची खालें ।
ज्वाला तरी ते वरती उफाळे ॥

'सारे जग जरी आमचा द्वेष करू लागले किंवा साऱ्या जगाचा जरी आम्हास द्वेष करावा लागला तरी,' भारताच्या अखंडत्वाबद्दलची ही निस्सीम तळमळ, तत्व, नीतिमत्तेशी कधीही तडजोड न करणारी करारी वाणी आणि भारतमातेच्या या सुपुत्राने मातृभूमीच्या चरणी वाहिलेली परमभक्ती,

की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने,
लब्ध-प्रकाश इतिहास-निसर्ग-माने
जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे,
बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे

कुठल्याही परिणामांची क्षिती, तमा न बाळगता, आंधळेपणाने नव्हे, संपूर्ण जाणतेपणाने निखाऱ्यांचा चोखाळलेला मार्ग... दिव्य दाहक हे अपघाताने नव्हे तर पूर्ण विचारांतीच स्वीकारलं आहे, हे सांगणारी त्यांची दृष्टी आणि भविष्याचा वेध घेणारी दूरदर्शी बुद्धिमत्ता!

'देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो आणि या देशाचे आपण देणे लागतो,' नवरसांच्या रांगेत जाऊन बसणारा मूर्तिमंत देशभक्तीचा रस म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर! क्रांतिकारकांचं स्फूर्तिस्थान, मृत्यूकडे स्वत: चालत जाणारे निर्भयी वीर सावरकर कोण्या ऐऱ्यागैऱ्याला झेपणं शक्य आहे का?

स्वातंत्र्यवीरांचं तेजस्वी तळपणं ज्याला पेलण्याची कुवत असेल त्याला हा देशभक्ती-कूटनीती- साहित्यप्रतिभेचा, समाजसुधारकाचा सूर्य नित्य प्रकाश देत राहील.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

इकरा अपहरण प्रकरणाच्या उच्चस्तरीय तपासाची खा. कल्याण काळे यांची मागणी; शिष्टमंडळाने दिले जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

अंबड शहरातील फैसलाबाद कॉलनी येथील ३ वर्षीय इकरा अमजद मनियार मुलीच्या अपहरण प्रकरणाचा १२ जानेवारी २०२५ पासून शोध सुरू आहे. मात्र, ४६ दिवस उलटूनही तपासाला वेग आलेला नाही. त्यामुळे मुलीच्या कुटुंबीयांवर मोठा मानसिक ताण येत असून, पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेच्या उच्चस्तरीय तपासाची मागणी खा. डॉ. कल्याण काळे यांनी केली असून, त्यांच्यामार्फत काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

खा. डॉ. काळे यांच्यावतीने अंबड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष कल्याणराव तार्डे, अंबड शहराध्यक्ष जाकीरभाई डावरगावकर, माजी नगरसेवक शेख शकील लालमिया, हाजी अब्दुल हमीद, माजी नगरसेवक सय्यद अझहर, युवक काँग्रेस जालना विधानसभा अध्यक्ष शेख वसीम, काँग्रेसचे जिल्हा सचिव लक्ष्मणराव बोंबले आणि रसूलभाई यांनी आज गुरुवार दि. २७ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. त्यात म्हटले आहे की, अंबडमध्ये घडलेल्या या धक्कादायक घटनेला ४६ दिवस उलटूनही कोणतेही ठोस निष्कर्ष समोर आलेले नाहीत. अपहरणाच्या सुरुवातीच्या २४ तासांतच प्रभावी तपास होणे अपेक्षित होते, मात्र तसे झाले नाही. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून, शहरात असुरक्षिततेचे वातावरण आहे.या प्रकरणाचा तपास तातडीने जलदगतीने करण्यात यावा तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. जर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत काँग्रेस पक्ष तडजोड करणार नाही व या प्रकरणाचा तपास जलदगतीने व्हावा यासाठी लढा सुरूच राहील, असा निर्धार काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. अंबडमध्ये निर्माण झालेल्या असुरक्षिततेच्या वातावरणामुळे नागरिकांमध्ये भीती आहे. पोलीस प्रशासनाने तत्काळ उच्चस्तरीय तपास करून सत्य समोर आणावे, जेणेकरून नागरिकांचा विश्वास प्रशासनावर पुन्हा बसू शकेल, असे खा. डॉ. कल्याण यांनी निवेदनात म्हटले आहे.

संक्षिप्त

खांडवी येथे कामगार एकता युनियन शाखेची स्थापना

तभा वृत्तसेवा
परतुर/प्रतिनिधी

खांडवी तालुका परतुर या ठिकाणी कामगार आयुक्त युनियनची शाखेची स्थापना झाली आहे. अध्यक्ष सुखदेव बरकुले, उपाध्यक्ष बाळासाहेब बरकुले, सचिव तुकाराम भारसाकळे, सल्लागार अर्जुन भारसाकळे यांची निवड झाली आहे.

कामगार एकता युनियन मागील ८ वर्षापासून विकासात्मक / शासन निर्णयातून वंचित राहिलेल्या घटकांसोबत कार्यरत आहोत. घरेलू महिला कामगार,पथविक्रेते, आणि नाका कामगार प्रस्थापित असंघटीत कामगार वर्गाला, कामगारांच्या अधिकाराची जाणीव करून देणे आणि अधिकार समजावून त्यांचे सक्षमीकरण करणे, ही महत्वाची भूमिका पार पाडत आहे. लोकांचे संघटन करून लोक संघटनेची बांधणी करणे आणि लोकानी लोकांसाठी संघटनारूपी एकत्र येऊन सुरु असलेल्या विकासाची व बदलावाची चर्चा, संवाद, विचार घडवून आणणे हा आमचा उद्देश आहे. उपस्थिती कामगार एकता युनियन तालुका अध्यक्षा विठ्ठल भारसाखळे जिल्हाध्यक्ष सुखदेव घोडे रतीव पाटील आणि सतीश लोंढे यांनी निवड झालेल्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

रमजानच्या पार्श्वभूमीवर मुस्लिम बहुल भागात स्वच्छतेसह नागरी सुविधा द्या –अर्जुन पाडेवार

तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

पवित्र रमजान महिना लवकरच सुरु होणार असून शहरातील सर्वच प्रभागातील मुस्लिम बहुल भागांमध्ये नगरपालिकेने स्वच्छता अभियान राबवून नागरी सुविधा द्याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी केली आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की,पवित्र रमजान महिना २ मार्चपासून सुरु होत आहे.या कालावधीत मुस्लिम बांधव संपूर्ण महिनाभर उपवासासह अल्लाहची उपासना करतात.यामध्ये छोटया बालकांसह तरुण तसेच वृद्धमंडळीचा समावेश असतो.परंतु सध्या शहरात अनेक नागरी समस्या दिसून येतात. रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्वच प्रभागातील मुस्लिम बहुल भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुरळीत करणे, विद्युत जोडणी पूर्ण करणे तसेच परिपूर्ण स्वरूपात स्वच्छतेची कामे करणे इत्यादी कामे प्राधान्याने व पवित्र रमजान महिना सुरु होण्यापूर्वीच करावीत जेणेकरून सर्व प्रभागातील प्रमुख रस्ते,नाल्याची साफसफाई होईल असे दिलेल्या निवेदनात पाडेवार यांनी म्हटले आहे.

मंठा शहरात भव्य आदीयोगी (महादेव) मूर्ती स्थापना शिवालय प्राईड भव्य प्लॉटिंग शुभारंभ

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

शहरात महाशिवरात्रीच्या पाश्वभूमीवर भव्य दिव्य अशी आदियोगी (महादेव) मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला यावेळी शिवालय प्राईड च्या संयुक्त विद्यमाने भव्य प्लॉटिंग चा शुभारंभ व महाप्रसादाचे आयोजन मंठा शहराचे मा.नगराध्यक्ष तथा विद्यमान न.प. गटनेते नितीन राठोड यांच्या पुढाकाराने व्यवस्थापक अविनाश खांडेकर, अनुप आबड,ओमप्रकाश पेरे ,सचिन जैवळ, मयूर गोरे यांच्या प्रमुख सहकाऱ्याने भव्य दिव्य कार्यक्रम सोहळा पार पडला या कार्यक्रमास माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनरावजी लोणीकर यांनी भेट दिली श्री आदियोगी चे दर्शन घेऊन नितीन राठोड यांना आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या व मनमोहक , आकर्षक अश्या आदियोगी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केल्या बद्दल विशेष कौतुक केले.

शिवालय प्राईड चे आयोजक व व्यवस्थापक यांच्या हस्ते आमदार लोणीकर यांचा स्वागत सत्कार यावेळी करण्यात आला. या भव्य दिव्य सोहळ्यास विधानपरिषद सदस्य आ.राजेश राठोड, नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे,उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे,जि.प.सदस्य पंजाब बोराडे, नगरसेवक शेख साजीद, नगरसेवक सचिन बोराडे,नगरसेवक शेषनारायण दवणे, नगरसेवक विकास सुर्यवंशी,नगरसेवक राजेश खंदारे,मा.उपनगराध्यक्ष जे.के भाई कुरेशी,नगरसेवक बाज पठाण,नगरसेवक प्रल्हादराव बोराडे, यांच्यासह मोठ्या संख्येने परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

गोंदी पोलीसांनी चोरीस गेलेल्या ट्रॅक्टरचा २४ तासात शोध घेऊन चोरास केले जेरबंद

तभा वृत्तसेवा
अंबड प्रतिनिधी

दिनांक २५/०२/२०२५ रोजी ०७.०० वा चे सुमारास मौजे पैठण फाटा शहागड येथे हॉटेल विराज चे समोर सर्वीस रोडवर उभा केलेले ट्रॅक्टर क्रमांक चक-२०-ऋग-०९८९ हे ईसम नामे जनक यमाजी घमाट रा. गंगाचिंचोली ता. अंबड जि.जालना याने त्याचे स्वतःच्या फायदयासाठी लबाडीच्या ईरादयाने ५,००००००/- रुपये किमतीचे ट्रॅक्टर महिंद्रा कंपनीचे ६०५ उख अर्जुन अल्ट्रा मॉडेल असलेले ट्रॅक्टर ज्याचा आर.टी.ओ पासींग क्रमांक चक-२०-ऋग-०९८९ असे असेलेले जु.वा. किं.अं. असे चोरुन घेवुन जात असतांना मिळून आला त्यावरुन पोस्टे गोंदी गुरनं ६०/२०२५ कलम ३०३ (२) प्रमाणे यातील फिर्यादी राजेंद्र सुभाष कदम वय ४० वर्ष व्यवसाय शेती रा. कोली ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर मो.क्र.९८२३५२८५११ यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद वर्णानाचे ट्रॅक्टर जप्त करण्यात आले असुन आरोपीस अटक करण्यात आले आहे. सदरची कामगीरी ही पोलीस अधिक्षक अजयकुमार बंसल साहेब, अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी साहेब, जालना उपविभागीय पोलीस अधिकारी श्री खांबे साहेब यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. श्री खांडेकर, पोउपनी राऊत, पोउपनी हावले, पोहेकॉ/०८ केंद्रे, पोकॉ/१४ सिद्दीकी, यांनी कारवाई केली असुन सदर गुन्ह्याचा पुढील गुन्ह्याचा तपास पोहेकॉ/०८ केंद्रे करत आहेत.

शिवालयात 'ओम नमः शिवाय'चा गजर

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

'ओम नमः शिवाय', 'हर हर महादेव' असा जयघोष मंगळवारी पहाटेपासूनच शिवालयामध्ये घुमत होता. महाशिवरात्री निमित्ताने भाविक भक्तांनी तालुक्यातील शिवालयामध्ये दर्शनासाठी गर्दी दिसून येत होती.

मंठा शहरातील श्री विठ्ठल-रुख्मिणी मंदिरातील मंठेश्वर महादेव, हेलस, केदारवाकडी, दहिफळ खंदारे, निळकंठेश्वर, अंभोडा कदम, उस्वद, सरकटे वझर, माळतोंडी येथील पाप हरेश्वर यासह ठिकठिकाणी महादेव मंदिरामध्ये भाविकांची दिवसभर दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. महाशिवरात्री निमित्ताने शिवालयामध्ये दिवसभर विविध धार्मिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक शिवालयामध्ये भाविक भक्तांच्या वतीने फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. मंठा शहरातील कानडी गल्लीतील मल्लिनाथ महादेव मंदिरामध्ये नगराध्यक्ष सौ. वंदनाताई वैजनाथ बोराडे यांच्या हस्ते महापूजा करण्यात आले. शिवरात्रीनिमित्त शिवालयात पहाटेपासूनच महाअभिषेक, महापूजा, लघु, रुद्र व दुग्धाभिषेक, शिवलीलामृत पारायण यासह महापूजा व महा आरती करण्यात आली. महाशिवरात्री निमित्ताने तालुक्यातील महादेव मंदिरावर विद्युत रोषणाई व फुलांची आरास करण्यात आली होती. मंठा तालुक्यातील केदार वाकडी सह अनेक ठिकाणी यात्रा देखील भरते.

गाडगेबाबा पुरोगामी विचाराचे संत –ॲड.एफ.एस.सिरसाठ

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

गाडगे बाबा हे गोरगरीब, पददलित, अस्पृश्य आणि स्वच्छतेचे एक दिलदार कार्यसम्राट होते. पुरोगामी विचारांचा हा संत नवसमाज निर्मितीसाठी किर्तनातून लोकांना जागृत करीत असत. ही साधी बाब नसून ती क्रांतीप्रणव आहे. आपल्या प्रदीर्घ आयुष्यात हजारोंच्या वर जातीधर्माचे एकत्रीकरण केले. किर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धेवर घणाघाती हल्ला केला. बहुजन, अस्पृश्यांच्या, शिक्षणासाठी कर्मवीर भाऊराव पाटील, बाबासाहेब यांच्या साथीला राहिले. कारण बुरसटलेल्या प्रथा परंपरा विरहित नवीन समाज निर्माण करावयाचा होता, असे प्रतिपादन ड.एफ.एस.सिरसाठ यांनी केले आहे.

भोकरदन येथे महाराष्ट्र राज्य परीट धोबी सेवा मंडळ शाखा तालुका भोकरदनच्या वतीने येथील खंडोबा मंदिराच्या सभागृहात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य संजय पैठणकर, ड. एफ. एच.सिरसाठ, किशोर सोनवणे, उत्तमराव सोनवणे, धोंडीराम पैठणकर यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान भारती सिरसाठ, रुद्र पैठणकर, सिद्धी पैठणकर यांची समयोचित भाषणे झाली. समाज बांधवांच्या वतीने जयंतीनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात येऊन अन्नदान करण्यात आले. यावेळी धोंडीराम पैठणकर, किशोर सोनवणे, शामराव जाधव, उत्तमराव सोनवणे, विनोद पैठणकर, संदीप पैठणकर, अजय पैठणकर, सागर पैठणकर, शुभम पैठणकर, सचिन पैठणकर, राहुल पैठणकर, संतोष पैठणकर, विशाल पैठणकर, गजानन शिरसाठ, उमेश शिरसाठ, राजेंद्र पैठणकर, यश पैठणकर, रवींद्र पैठणकर, गजानन पैठणकर, कैलास पैठणकर, अमित पैठणकर, किरण पैठणकर, राजू पाटील, प्रल्हाद पैठणकर, स्वप्निल पैठणकर, सचिन वाघ यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार राजेंद्र पैठणकर सर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य परीट सेवा मंडळ तालुका शाखा भोकरदनची कार्यकारी मंडळ गठित करण्यात आली. यात सर्वानुमते सागर जगदीश पैठणकर यांचे अध्यक्ष म्हणून तर गजानन पैठणकर यांची कार्याध्यक्ष व उपाध्यक्ष गोपाल पैठणकर यांची निवड करण्यात आली. या संपूर्ण कार्यकारिणी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या नूतन कार्यकारिणीचे समाजाच्या सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

गृहमंत्री साहेब जिल्ह्यातील अवैध धंद्याचा मुख्य आका शोधून कारवाई करा

काँग्रेस पर्यावरण विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश गवळी

तभा वृत्तसेवा
जाफराबाद/प्रतिनिधी

जाफराबाद तालुक्यातच नाहीतर जिल्हात सुरू असलेल्या अवैधधंदे, अवैधवाळू वाहतूक,गुटखा माफिया, तांदूळ चोरी राजरोसपणे सुरू आहे,या माफियांची तर आता महसूल प्रशासनावर हल्ले देखील करण्यात मजल वाढली आहे, यांच्या मागील आका कोण?असा प्रश्न आता सर्व सामान्य माणसाला पडू लागला आहे. आम्ही या विरोधात वेळोवेळी आवाज उठवला परंतु जिल्हा प्रशासन असेल तालुका प्रशासन असेल याकडे साफ दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे काही दिवसापासून तालुक्यामध्ये नाहक बळी जात आहे.आजच्या घटनेलाही महसूल प्रशासनासह या पुलाचे काम करणारा ठेकेदार रेतीची रॉलटी चुकवण्याच्या नादात नाहक मजुरांचे बळी गेले,या बेजबाबदार ठेकेदार असून या ठेकेदाराविरुद्ध मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अशी आमची प्रशासनाला मागणी आहे. आणि राज्याच्या गृहमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांना विनंती आहे की त्यांनी या जिल्ह्यातील आका चा शोध घेऊन अजून जाणारे नाहक बळी थाबवावेत अशी मागणी आम्ही करत आहेत.

पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यातून ५८ उमेदवारांची निवड

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने हुतात्मा जनार्दन मामा नागापुरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मंगळवार दि.२५ फेब्रुवारी २०२५ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा घेण्यात आला. मेळाव्यात ५८ उमेदवारांची निवड करण्यात आली.

पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे उदघाटन आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण अधिकारी अतुल केसकर होते तर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या उपप्राचार्य रजनी शेळके, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

मेळाव्यात मुलाखतीतून उमेदवारांची विविध पदासाठी प्राथमिक निवड केली. यात नवभारत फर्टिलायझर्स एल.एल.पी. छत्रपती संभाजीनगर १४, युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी प्रा. लि. मुंबई १०, परिनिका न्युरोकेअर हॉस्पीटल १०, एस.बी.आय. लाईफ इन्शूरन्स १३ , ओम साई राम स्टील अलॉइज १० , टी.के. प्रिसीजन प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर १, अशा एकुण ५८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. याठिकाणी आणासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालय जालनामार्फत तीन लाभार्थ्यांना ट्रॅक्टरचे वाटप आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वयंरोजगार करण्यास इच्छूक उमेदवारकरिता शासनाचे विविध महामंडळाचे स्टॉल उभारून लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याबाबतची सविस्तर माहिती देण्यात आली. मेळाव्यात सूत्रसंचालन डॉ. अमोल परिहार यांनी केले तर आभार सुरेश बहुरे यांनी मानले. मेळाव्यासाठी कौशल्य विकास रोजगार विभागाचे कौशल्य विकास अधिकारी भुजंग रिठे, अमोल बोरकर, प्रदीप डोळे, रविंद्र पाडमुख, सुभाष पंडित, विशाल जगरवाल, दिनेश उढाण, सोमेश्वर शिंदे, शालिकराम वाघ आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे गट निदेशक एस.एस.कापसे, एस.जी.चव्हाण तसेच कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड.धर्मपाल मेश्राम यांनी घेतली पीडित कुटुंबियांची भेट

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) ॲड.धर्मपाल मेश्राम यांनी जालना येथील रमाबाई नगरातील हत्या झालेल्या मोनिका झांबरे-निर्मळ यांच्या कुटुंबियांची भेट घेत आस्थेवाईकपणे विचारपूस केली.

यावेळी समाज कल्याण सहायक आयुक्त प्रदीप भोगले, पोलिस उपअधिक्षक दिलीप भागवत, पोलिस निरीक्षक एस.के.माने, ज्ञानदेव नागरे, दिनकर घेवांदे यांच्यासह पीडितेच्या कुटुंबियांची उपस्थिती होती. मयत मोनिका यांच्या कुटुंबियांची आस्थेवाईकपणे विचारपूस करत मुलीची नोकरी, वैवाहिक जीवन, शैक्षणिक तसेच आर्थिक पार्श्वभूमी जाणून घेतली. मयत मोनिका या छत्रपती संभाजीनगर येथे परिचारिका म्हणून काम करत होत्या. तसेच त्या अनुसूचित जातीमधील असल्याने त्यांना शासकीय मदत देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. यावेळी मयत मुलीच्या आई-वडिलांसह कुटुंबियांनी यावेळी या सर्व प्रकरणाचा सखोल तपास करत न्याय देण्याची विनंती केली. यावर ड. मेश्राम यांनी शासनस्तरावरुन सर्वोतोपरी मदतीसह तपासाला सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

आदिवासी विशेषपद भरती तत्काळ सुरू करण्याची विद्यार्थ्यांची मागणी

जिल्हाधिकारी कार्यालयावर आदिवासी विद्यार्थ्यांचा मोर्चा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ फेब्रुवारी

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनुसूचीत जमाती प्रवर्गातील अनेक शासकीय-निमशासकीय नौकरीच्या जागेमध्ये गैर आदिवासी लोकांनी अनुसूचीत जमातीचे खोटे प्रमाणपत्र काढून खऱ्या आदिवासी समाजाच्या जागा बळकावल्या आहेत. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुळ आदिवासी समाजाची विशेषपद भरती तत्काळ सुरू करावी या मागणीसह इतर मागण्यांसाठी शुक्रवार दि २८ फेब्रुवारी रोजी आदिवासी विद्यार्थी संघटना आणि आदिवासी युवक कल्याणसंघाच्यावतीने मोर्चा काढून जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवण्यात आले आहे.

माजी आ. डॉ संतोष टारफे आणि आदिवासी युवक कल्याण संघाचे अध्यक्ष डॉ सतीश पाचपूते यांच्या नेतृत्वात शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठ्या संख्येने आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थींनींनी मोर्चा काढला. यावेळी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत बोगस आदिवासींना हटवून त्याजागी मुळ आदिवासी यांची नोकरभरती करण्याची जोरदार मागणी करण्यात आली. निवेदनात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १२ हजार ५०० पदासाठी आदिवासी विशेषपद भरती धेण्यात यावी, यासाठी अतिशय संथगतीने काम चालू आहे. अनेक उच्चशिक्षित आदिवासी विद्यार्थी जागा निघण्याच्या प्रतिक्षेत असून एमए,बीए बीएड, बीएससी झालेले विद्यार्थी ऊसतोड, वीटभट्टी कामगार म्हणून काम करीत आहेत. मुळ जागा बोगस प्रमाणपत्र काढणाऱ्या लोकांनी बळकावल्या आहेत. त्यांना अभय देण्याचे काम होत असून खऱ्या आदिवासी विशेषपद भरती शासन घेतांना दिसून येत नाही. शासनाने अद्याप अनुसूचीत जमातीचे ५० हजार च्यावर रिक्तपदे भरले नसून ही गंभीर बाब आहे. ही पदे तत्काळ भरण्यात यावीत, बिंदुनामावलीत अनुसूचीत जमातीच्या कमी जागा असल्यामुळे त्यांच्या अन्याय होत आहे. टीआरटीआय आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्यावतीने पोलिस भरती, बँकींग, एमपीएससी, युपीएससी आदी शैक्षणिक प्रशिक्षण चालविले जातात. परंतु याचा कालावधी कमी आहे. हा कालावधी दीड वर्षापर्यंत करण्यात यावा, अनुसूचीत जमाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात यावे, शासकीय वसतीगृहता पूर्वीप्रमाणे भोजनाची व्यवस्था करण्यात यावी, टीसीएस, आयबीपीएस परीक्षेचे शुल्क कमी करण्यात यावे, वनसेवक पदासाठी शैक्षणिक मर्यादेचा शासन निर्णय रद्द करून सर्व शिक्षीत, उच्च शिक्षित उमेदवारांना संधी उपलब्ध करून द्यावी या मागण्यांचा समावेश आहे. यावेळी जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या मोर्चात संजय काळे, बबनराव डुकरे, मारोती चिभडे, किसन मारकड, संतोष लाखाडे, कैलास लाखाडे, अमोल ढोके, योगेश धनवे, चंदु माघाडे, वैभव इंगळे, शिवाजी इंगळे आदींसह मोठ्या संख्येने आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थींनी सहभागी झाले होते.

यावेळी बोलतांना डॉ टारफे म्हणाले की, यापूर्वीही आम्ही या मागण्यांसाठी मोर्चा काढला होता. आम्ही संविधानीक पध्दतीने मुळ आदिवासींना न्याय देण्याची मागणी करीत आहोत. परंतु शासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास राज्यभर आदिवासी युवक-युवती तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

औंढा नागनाथ येथे आज रथोत्सव सोहळा

तभा वृत्तसेवा
औंढा नागनाथ, २८ फेब्रुवारी

महाशिवरात्रीनिमित्त येथील श्री नागनाथ मंदिरामध्ये शनिवारी (ता. १) मार्चला रथोत्सव होणार असून, जय्यत तयारी करण्यात आली आहे.महाशिवरात्री यात्रेनिमित्त दरवर्षी विविध कार्यक्रम होतात. त्यात रथोत्सव भाविकांसाठी पर्वणी असते. शनीवारी रात्री दहाला रथोत्सव होईल. मंदिर संस्थानचे कर्मचारी हा रथ ओढतील. मंदिराला पाच प्रदक्षिणा घातल्या जातील. यावेळी मोठा पोलिस बंदोबस्त असेल. कार्यक्रमावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर असेल. रात्री बाराला रथोत्सवाची सांगता होणार आहे.

दरम्यान, हिंगोली येथील बॉम्बशोधक व बॉम्बनाशक पथकाने नागनाथ मंदिर परिसरात आज तपासणी केली. तसेच शासकीय तंत्रनिकेतन (आय टी आय)हिंगोली यांनीही रथाची तपासणी करून तपासणी अहवाल नागनाथ संस्थांना दिला आहे. नागनाथ देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, मंदिर सुरक्षा गार्डप्रमुख बबन सोनुने, बॉम्बशोधक व नाशक पथकाचे प्रमुख सपोनी अनिल काचमांडे, रवी गंगावणे, प्रवीण बांगर, एजाज शेख, रोहित मुदीराज, प्रबुद्ध सोनकांबळे, ताहेर, बद्रीनाथ गायकवाड, श्वान ओरियंट आदींनी सुरक्षेच्या दृष्टीने ही तपासणी करून आढावा घेतला.

औंढा नागनाथ नगरपंचायतकडून महाशिवरात्री निमित्ताने शनिवारी एक मार्चला भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले आहे. या कुस्ती स्पर्धेला कळमनुरी विधानसभेचे आमदार संतोष बांगर, नगराध्यक्ष एस पी कनकुटे, उपनगराध्यक्ष अनिल देव, नगरसेवक तसेच कुस्तीचे पैलवान उपस्थित राहणार आहेत. नगरपंचायतीतर्फे शनिवारी सकाळी अकराला कुस्ती स्पर्धा होतील. प्रथम बक्षीस २३ हजार १११, द्वितीय १३ हजार १११ व तृतीय बक्षीस ९ हजार १११ रुपये ठेवण्यात आले.

अन्न व्यावसायिकांना अन्न परवाना, नोंदणी प्रमाणपत्र बंधनकारक

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ फेब्रुवारी

अन्न व्यावसायिकांना व्यवसाय करण्यासाठी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ चे कलम ३१ अंतर्गत परवाना घेणे किंवा नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. परवाना अथवा नोंदणी प्रमाणपत्र न घेता व्यवसाय करणे कायद्याच्या कलम ६३ अन्वये दंडनीय गुन्हा आहे.त्यामुळे सर्वांनी नोंदणी व अन्न परवाना प्रमाणपत्र काढून घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ मध्ये अन्न व्यावसायिकाची व्याख्या स्पष्ट केली आहे. अन्न पदार्थाचा व्यवसाय करणारे स्टॉलधारक व फिरते विक्रेते जरी पाणीपुरी, भेलपुरी, पावभाजी विक्रेते, आईसक्रीम, बर्फ गोळा, ज्यूस, शरबत विक्रेते, भाजीपाला व फळ विक्रेते, किरकोळ किराणा, डेली नीड्स, बेकरी, घाऊक विक्री करणारे वितरक व वाहतूकदार, गृहउद्योग ते अन्न पदार्थाचे उत्पादक, तसेच उपहारगृह, हॉटेल, खानावळ, चहा विक्रेते, दूध विक्रेते त्याचबरोबर स्वस्तधान्य दुकानदार, कॅटरर्स, शालेय पोषण आहार पुरवठादार, बचत गट, शासकीय, अशासकीय कार्यालयातील कँटीन, वसतिगृहातील खानावळ, धार्मिक ठिकाणी वितरित होणारा प्रसाद, मेळावे व प्रदर्शनामधील अन्न पदार्थाचे स्टॉलधारक इत्यादी सर्व अन्न व्यावसायिक या वर्गवारीच्या कक्षेत येतात. हिंगोली जिल्ह्यामध्ये आज रोजी ५८४ परवाना व ३ हजसा ४४५ नोंदणी प्रमाणपत्र असे एकूण ४ हजार २९ सक्रीय परवाना व नोंदणी धारक अन्न व्यावसायिक आहेत. काही अन्न व्यावसायिकांनी मुदतीपूर्व परवान्याचे नूतनीकरण केले नसल्याने अनेक परवाना धारक सक्रीय नसल्याचेही आढळून आलेले आहेत. परवाना किंवा नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी षैलो.षीरळ.सीं.ळप या संकेत स्थळावर ऑनलाइन पद्धतीने आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे. सर्व अन्न व्यावसायिकांनी आपल्या व्यवसायासाठी त्वरित ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करून परवाना अथवा नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. परवाना व प्रमाणपत्राची मुदत संपली असल्यास नूतनीकरण करण्यात यावे. सक्रीय परवाना अथवा नोंदणी प्रमाणपत्र न घेता व्यवसाय करीत असल्याचे आढळून आल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येईल, याची सर्व अन्न व्यावसायिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, हिंगोली यांनी केले आहे.

हिंगोली- येथील रिसाला बाजार भागातील श्री नर्मदेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त आकर्षक फुलांची सजावट तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रमेशचंद्र बगडीया यांच्यासह कुटुंबिय आणि भाविक उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर

संक्षिप्त वृत्त

आज ललीत गांधी यांचा हिंगोली दौरा

हिंगोली- जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी हे हिंगोली दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या सुधारित दौरा कार्यक्रमाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. शुक्रवार, दि. २८ फेब्रुवारी, २०२५ रोजी परभणी येथून वाहनाने निघून रात्री १० वाजता हिंगोली येथे आगमन व मुक्काम, निवार, दि. १ मार्च, २०२५ रोजी सकाळी ७ वाजता हिंगोली येथील पुसेगाव, सेनगाव, राम गल्ली, जिजामातानगर येथील जैन मंदिरास सदिच्छा भेट. १०.३० वाजता ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप बँक यांच्या तिरुपतीनगर येथील नवीन इमारत उद्घाटन समारोहास उपस्थिती व मार्गदर्शन. दुपारी १.३० वाजता हिंगोली जिल्हधिकारी यांच्यासोबत बैठक व व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा, २.३० वाजता जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन, ४ वाजता वाशिमकडे प्रयाण.

स्वाधार योजनेसाठी त्रुटींची पूर्तता करा

हिंगोली- शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या, शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास, भोजन व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी ११ वी, १२ वी तसेच १२ नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात, शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहातील मुलां-मुलीप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून या योजनेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळावर दिनांक १५ जानेवारी, २०२५ पर्यंत स्वीकारण्यात आले होते. या अर्जाची छाननी केली असता अनेक अर्जामध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्रुटीचे अर्ज त्रुटी पुर्ततेसाठी विद्यार्थी लॉगीनला रिव्हर्ट/ सेंड बॅक करण्यात आलेले आहेत. विद्यार्थी लॉगीनला दिसत असलेल्या त्रुटी पूर्ण करून विद्यार्थ्यांने आपला अर्ज ऑनलाईन पद्धतीने तात्काळ परत सबमीट करावे, असे आवाहन यादव गायकवाड, सहायक आयुक्त, समाजकल्याण, हिंगोली यांनी केले आहे.

कामगारांचे लाभाचे अर्ज निकाली काढा

हिंगोली- कामगारांची नोंदणी, नूतनीकरण तसेच लाभाचे अर्ज निकाली काढण्यासंदर्भात बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समितीच्यावतीने कामगार अधिकारी पेरके यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी कार्यालयात नोंदणीकृत बांधकाम कामगारांची नोंदणी, नूतनीकरण असलेले प्रलंबीत अर्ज लवकरात लवकर निकाली काढावेत अशी मागणी करण्यात आली. यावेळी कामगार अधिकारी पेरके यांनी लवकरच नोंदणी व नुतनीकरणाचे अर्ज निकाली काढण्याचे आश्वासन दिले. यावेळी जनप्रहार कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नितीन दवंडे, महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष नितीन घोडके उपस्थित होते

कुर्तडी येथे नवीन कायदेविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ फेब्रुवारी

कळमनुरी तालुक्यातील कुर्तडी येथील सरस्वती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयात नवीन कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराला चांगला प्रतिसाद मिळाला.

नवीन कायदे बीएनएसएस, बीएनएस, बीएसए यावर मान्यवरांनी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक मुंचडी तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुट्टे, जिल्हा व सत्र न्यायालयाचे वकील ॲड प्रभाकर मोरे, पोलिस उपनिरीक्षक गणेश गोटके, ॲड गुणानंद पतंगे यांची उपस्थिती होती.

यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नवीन कायदेविषयक सखोल मार्गदर्शन करण्यात आले. नवीन कायद्याबाबत विद्यार्थ्यांनी काही प्रश्न उपस्थित केले. या प्रश्नांना मान्यवरांनी उत्तरे देत विद्यार्थ्यांचे शंका निरसनही केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा उषा बागल यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयचे प्राचार्य, प्राध्यापक तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

भारतरत्न नानाजी देशमुख पुण्यतिथी सोहळा उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ फेब्रुवारी

हिंगोलीचे भूमिपुत्र भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या १५ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम तसेच क्रिस्प संचालित भारतरत्न नानाजी देशमुख कौशल्य विकास व उद्योजकता केंद्राच्या वर्षपूर्ती सोहळ्याचे भव्य आयोजन शिवाजी सभागृह, हिंगोली येथे करण्यात आले.

कार्यक्रमास हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल, क्रिस्पचे एमडी व चेअरमन डॉ. श्रीकांत पाटील, संजय कौडगे, माजी आमदार गजानन घुगे, तसेच फुलाजी शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या जीवनावर आधारित विशेष चित्रफीत आणि क्रिस्पच्या कार्यप्रवासावरील व्हिडिओ प्रस्तुतीकरणाने करण्यात आली. यानंतर फुलाजी शिंदे यांनी नानाजींच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला, तर गजानन घुगे यांनी नानाजींच्या सामाजिक कार्याचा विस्तृत आढावा घेतला.

संजय कौडगे यांनी क्रिस्प आणि डॉ. श्रीकांत पाटील यांच्या कार्याचे कौतुक करत संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच, विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त कौशल्य विकास उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

क्रिस्पचे व्यवस्थापकीय संचालित डॉ. श्रीकांत पाटील यांनी नानाजी देशमुख यांच्या कार्यातून मिळालेल्या प्रेरणेचा उल्लेख करत, हिंगोलीतील युवकांसाठी क्रिस्पच्या माध्यमातून आगामी काळात हजारो विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देण्याचा संकल्प व्यक्त केला.

हिंगोलीतील हजारहून अधिक प्रशिक्षणार्थींमध्ये निवडक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि कौशल्य विकास किटचे वाटप करण्यात आले.

हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी क्रिस्प आणि डॉ. श्रीकांत पाटील यांच्या कार्याची प्रशंसा करत, हिंगोलीसारख्या शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे कौशल्य विकास केंद्र असणे अभिमानास्पद आहे असे नमूद केले. तसेच, भारतरत्न नानाजी देशमुख कौशल्य विकास व उद्योजकता केंद्रासोबत प्रशासनाचे सहकार्य राहील आणि भविष्यात विविध प्रकल्पांवर एकत्रित काम करण्याचा मानस आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाला तरुण वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या सोहळ्याचे सूत्रसंचालन पुष्यमित्र जोशी यांनी, तर आभार प्रदर्शन संचालक अमोल वैद्य यांनी केले.

आजपासून राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २८ फेब्रुवारी

० ते १८ वयोगटातील बालकांच्या आरोग्याची काळजी घेणे हे अत्यंत महत्त्वाचे असते त्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांच्या सनियंत्रणात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत हिंगोली जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय शाळा आणि अंगणवाडीतील ० ते १८ वर्षे वयोगटातील बालके, किशोरवयीन मुला-मुलींची सर्वांगीण आरोग्य तपासणी आणि जन्मजात आजार व इतर आजारांवर विनामूल्य उपचार व संदर्भ सेवा विनामूल्य शस्त्रक्रिया या सार्वजनिक आरोग्य विभाग, एकात्मिक बालविकास विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, नगर विकास विभाग यांच्या समन्वयाने करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्दिष्ट शून्य ते अठरा वर्ष वयोगटातील बालकांची, किशोरवयीन मुला-मुलींची प्राथमिक आरोग्य तपासणी करणे आणि आजारी आढळलेल्या बालकांवर त्वरित उपचार करणे असे आहे. तसेच गरजू बालकांना संदर्भ सेवा देऊन उपचार करणे, प्रतिबंधनात्मक आरोग्य सेवा पुरवणे, सुरक्षित आणि सुदृढ आरोग्यासाठी समुदेशन करणे असे आहे. तपासणीमध्ये उच्चस्तरीय उपचार व शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या बालकांना सेकंडरी केअर सर्विसेस करिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मनपा रुग्णालय, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत अंगीकृत रुग्णालयात पुढील सेवा दिल्या जाणार आहेत.

शून्य ते अठरा वर्षे वयोगटातील बालकांची तपासणी करताना त्यांच्यामधील प्रामुख्याने आढळणारे आजार, व्यंग, जीवनसत्वांची कमतरता तसेच किशोरवयीन मुला मुली च्या समस्यांचा विचार करून त्या अनुषंगाने बालकांची सविस्तर तपासणी, उपचार व आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा देण्यात येणार आहे. नवजात बालकांमधील जन्मजात व्यंग ओळखून तसेच रक्तक्षय, डोळ्यांचे आजार, गलगंड, दंतविकार, हृदयरोग, क्षयरोग, कुष्ठरोग, कॅन्सर, अस्थमा आजारांच्या संशयित रुग्णांना संदर्भित करण्यात येणार आहे, त्यात ऑटिझम, विकासात्मक विलंब, लर्निंग डिसॅबिलिटी इ. संशयित रुग्णांना तसेच किशोरवयीन मुला-मुलींचे शारीरिक व मानसिक आजार शोधून समुपदेशन आणि आरोग्य सेवा देण्यात येणार आहे.

या मोहिमे अंतर्गत जन्मजात हृदयरोग हे अल्ट्रासाउंड आणि गर्भाच्या इकोकार्डिओग्राम द्वारे तपासले जाणार आहेत, तसेच दुभंगलेले ओठ आणि टाळू, जन्मजात बहिरेपणा, न्यूरल ट्यूब डिफेक्ट म्हणजेच जन्मजात असलेले न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर ज्यावर शस्त्रक्रियेने उपचार करता येतात, क्लब फूट म्हणजे जन्मजात दोष ज्यामध्ये पायाचा आकार स्थितीमध्ये बदल झाला आहे, हिप डिस्प्लेसिया म्हणजे नवजात शिशु आणि बालकांच्या हिप जॉईंट वर परिणाम करणारे स्थिती, प्रीमॅच्युरिटी रेटिनोपॅथी म्हणजे मुलांमध्ये अंधत्व येण्याचे एक प्रमुख कारण, अशा विविध बालकांमधील विविध प्रकारच्या तपासण्या या सदर कार्यक्रमांतर्गत करण्यात येणार आहे.

हिंगोली मध्ये सरस्वती विद्यामंदिर हिंगोली विद्यार्थी संख्या ६६०, वसमत तालुक्यात जवाहर बालक मंदिर उच्च प्राथमिक शाळा वसमत विद्यार्थी संख्या ५८०, औंढा (नागनाथ) तालुक्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोणेवस्ती तालुका औंढा विद्यार्थी संख्या ९०, कळमनुरी तालुक्यात बहिर्जी विद्यालय कळमनुरी विद्यार्थी संख्या २२२, सेनगाव तालुक्यात श्रीमती लक्ष्मीबाई येवले प्राथमिक विद्यालय सेनगाव विद्यार्थी संख्या ५३१ या शाळांमध्ये दिनांक १ मार्च २०२५ रोजी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम मोहीमेचे उद्घाटन करुन सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.